# 5 ग्रामीण विकास

## ग्रामीण विकासात पंचायती राज संस्थांची भूमिका

### स्थानिक स्वराज्य संस्थांचा इतिहास

- ग्रामीण स्तरावर प्रभावीरित्या विकास घडवून आणण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहिलेली आहे.
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्थापनेनंतर ग्रामीण विकासाला गती मिळाली आणि ग्रामविकासात स्थानिक लोकांचा सहभाग वाढीस लागला. त्यामुळे ग्रामीण विकास ही केवळ शासनाची जबाबदारी न राहता लोक चळवळ बनली.
- भारतात स्थानिक शासनाची सुरूवात 1687 साली झाली. त्यावर्षी मद्रास शहरासाठी महानगरपालिका स्थापन झाली. 1726 साली त्याचे मेयर कोर्टमध्ये रुपांतर करण्यात आले. (1726– मुंबई, मद्रास, कोलकाता येथे मेयर कोर्टाची स्थापना).
- 1793 च्या सनदी कायद्याने मद्रास, कोलकाता, मुंबई या तीन शहरांत 'जस्टिस ऑफ पीस' ची नियुक्ती करण्यात आली. त्यांचे स्वरुप प्रशासकीय असण्यापेक्षा न्यायिकच होते. याच वर्षी या तिन्ही शहरांसाठी पालिका प्रशासनाची निर्मिती करण्यात आली. त्यांना काही गोष्टींवर कर बसविण्याचे अधिकार देण्यात आले. तसेच शहरांची स्वच्छता, शांतता व सुव्यवस्था यांची जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यात आली.
- 1842 च्या बेंगॉल ॲक्टनुसार पालिका प्रशासनाचा विस्तार करून तो कायदा जिल्ह्यांचे मुख्य ठिकाण असलेल्या शहरांसाठी देखील लागू केला.
- 1870 च्या लॉर्ड मेयोच्या आर्थिक विकेंद्रीकरणाच्या ठरावानुसार नगरपालिकांसारख्या संस्थांच्या स्थापत्याची गरज प्रतिपादित करण्यात आली होती.
- 1882 लॉर्ड रिपनचा ठराव - खऱ्या अर्थाने स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत जनतेस राजकीय व लोकशाहीचे शिक्षण देणारा होता.

लॉर्ड रिपनला भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा जनक म्हटले जाते, तर 1882 च्या लॉर्ड रिपनच्या ठरावाला भारतातील स्था. स्व. सं. च्या इतिहासातील मॅग्नाकार्टा म्हटले जाते.

- लॉर्ड रिपनच्या ठरावातील महत्त्वाचे मुद्दे पुढीलप्रमाणे -
  - ➢ या संस्थांवर निर्वाचित सभासदांची संख्या जास्त असावी. संस्थांचे अध्यक्ष हे लोकनिर्वाचित असावेत.
  - ➢ स्था स्व. सं. यांना पुरेशी उत्पन्नाची साधने उपलब्ध करून द्यावी.
  - ➢ प्रांतिक सरकारने या संस्थांवर अप्रत्यक्ष नियंत्रण ठेवावे. तसेच आपल्या अर्थसंकल्पात या संस्थांसाठी आर्थिक साहाय्याची तरतूद करावी.
- Royal Commission on Decentralization - हॉबहाऊस यांच्या अध्यक्षतेखाली याची स्थापना 1907 मध्ये करण्यात आली. या कमिशनने आपला अहवाल 1909 मध्ये सादर केला. अहवालातील प्रमुख शिफारशी.
  - ➢ ग्रामीण भागासाठी खेडे हा प्रशासनाचा मूलभूत घटक मानला जावा व प्रत्येक खेड्यात ग्रामपंचायतीची स्थापना करावी.
  - ➢ निर्वाचित सदस्यांचे प्रमाण अधिक असावे.
  - ➢ स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या अधिकारात वाढ करावी.
  - ➢ नागरी भागासाठी नगरपालिकांच्या स्थापनेची तरतूद करावी व प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी नगरपालिकांवर सोपवावी.
- 1919 माँटेग्यू चेम्सफर्ड सुधारणा कायद्यानुसार भारतात प्रांतिक पातळीवर द्विदल राज्यपद्धती सुरू करण्यात आली. त्यानुसार प्रांतिक सरकारच्या अधिकारांत असलेल्या खात्यांची राखीव खाती व सोपीव खाती अशा दोन भागांत विभागणी करण्यात आली. स्थानिक स्वराज्य संस्था हा विषय सोपीव खात्यांच्या यादीत समाविष्ट करण्यात आला. त्यामुळे हा विषय लोकनियुक्त मंत्र्यांच्या हाती सोपवला.
- 1935 च्या भारत सरकार विषयक कायद्यानुसार प्रांतांना स्वायत्तता देण्यात आली स्थानिक स्वराज्य संस्था हा विषय प्रांत यादीत होता. त्यामुळे त्याबाबत कोणताही निर्णय घेण्यास प्रांत सरकार मुक्त होते. 1935 च्या कायद्यानुसार 1937 मध्ये 11 प्रांताच्या कायदेमंडळासाठी निवडणुका झाल्या. 8 प्रांतांत काँग्रेसने आपली मंत्रीमंडळे स्थापन

केली. या प्रांतांत काँग्रेसने खऱ्या अर्थाने स्थानिक स्वराज्य संस्था यांचे सशक्तीकरण करण्याचे प्रयत्न केले.

- स्थानिक स्वराज्य संस्थांची योजना 1937 मध्ये तयार करण्यात आली. पण सुधारित स्वरुपात तिची अंमलबजावणी 1948 पासून सुरू झाली. मध्य प्रांतातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे मंत्री D.P. मिश्रा हे त्या स्थानिक स्वराज्य संस्थांचे शिल्पकार होय.
- 1948 मध्ये तत्कालीन केंद्रीय आरोग्य मंत्री अमृता कौर यांच्या अध्यक्षतेखाली सर्व प्रांतांमधील स्थानिक स्वराज्य संस्था मंत्र्यांची परिषद घेतली.
- 1948 मध्ये बेरार स्थानिक शासन कायदा (जनपाडा योजना) स्वीकारण्यात आला. जिल्ह्याऐवजी तहसील हे ग्रामीण स्थानिक शासनाचे मुख्य केंद्र समजण्यात आले. यालाच जनपाडा म्हटले जात असे. जनपाडाद्वारे ग्रामीण व नागरी या दोन्ही स्थानिक शासनास एकत्र आणण्यासाठी जनपाडा सभा ही संकल्पना उदयास आली.
- 1872 च्या नगरपालिका कायद्याने मुंबई महानगरपालिका स्थापन करण्यात आली. 1888 मध्ये नवा मुंबई महानगरपालिका कायदा संमत करण्यात आला.
- जिल्हा व तालुका स्तरांवर निधी समित्यांची स्थापना झाली होती. त्यातून पुढे जिल्हा लोकल बोर्डाची स्थापना करण्यात आली.
- 1889 मध्ये मुंबई ग्राम आरोग्यरक्षण कायदा संमत झाला. त्यानुसार गावपातळीवर आरोग्य व पाणी याकरिता 'साफसफाई मंडळांची' स्थापना करण्यात आली.
- 1920 मध्ये मुंबई ग्रामपंचायत कायदा करण्यात आला. त्यानुसार गावपातळीवर ग्रामपंचायतींची स्थापना करण्यात आली. राज्यातील ग्रामपंचायतींच्या परिस्थितीची पाहणी करण्यासाठी 1925 मध्ये हॅच समितीची नियुक्ती करण्यात आली होती.
- महाभारत, अर्थशास्त्र, मनुस्मृतीमध्ये ग्रामसंघाचा उल्लेख आढळतो. महाभारतातील शांतीपर्वामध्ये ग्रामसभेसाठी 'संसद' हा शब्दप्रयोग आढळतो. वाल्मिकी रामायणामध्ये 'गणपद' चा उल्लेख आढळतो. वैदिक काळात खेडे हे प्रशासनाचे सर्वांत छोटे एकक मानले गेले. ग्रामप्रमुखास ग्रामणी म्हटले जात होते.
- 1926 कोल्हापूर संस्थानात कोल्हापूर पंचायत कायद्यान्वये ग्रामपंचायतींची स्थापना करण्यास सुरुवात.

## ग्रामीण विकासाशी संबंधित काही प्रकल्प

- **श्रीनिकेतन प्रकल्प** (1921) : सर रवींद्रनाथ टागोर यांनी श्रीनिकेतन येथे ग्रामीण पुनर्उभारणी संस्थेची स्थापना केली. विसाव्या शतकातील ग्रामीण भागाच्या विकासातील पहिला प्रयत्न म्हणून श्रीनिकेतन प्रकल्पाचा उल्लेख केला जातो. या संस्थेने आठ गावांचा एक गट तयार करून ग्रामीण विकासाची संबंधित कार्ये सुरू केली.
- **गुरगाव प्रकल्प** (1927) : पंजाब मधील गुरगाव जिल्ह्याचे उपायुक्त ब्रायन यांनी या जिल्ह्यात ग्रामीण विकासाचा व्यापक कार्यक्रम हाती घेतला, ज्याचा उद्देश ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान उंचावणे हा होता.
- **माथऱ्यांड प्रकल्प** (1928) : माथऱ्यांड हे केरळ राज्यातील गाव होते, त्याठिकाणी स्पेन्टर हॅच यांनी लोकांनी लोकांना त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक उन्नतीस सहकार्य करावे या उद्देशाने प्रयत्न केले.
- **आदर्श खेडी प्रकल्प** (1903) : 1903 मध्ये पं. बंगालमधील सुंदरबन या ठिकाणी सर डॅनियल हेमिल्टन यांनी सहकारी तत्त्वावर आधारित आदर्श खेडी निर्माण करण्यासाठी एक योजना तयार केली होती.
- **इटावा पायलट प्रकल्प** (1948)
  - ➢ उत्तर प्रदेशातील इटावा या ठिकाणी अमेरिकेचे अल्बर्ट मेयर यांनी काही अमेरिकन नागरिक व भारतीय अधिकाऱ्यांच्या सहकार्याने हा प्रकल्प राबवला.
  - ➢ शासकीय सहभाग असलेला व वित्तीय साहाय्यता लाभलेला सर्वांत मोठा प्रकल्प म्हणून इटावा प्रायोगिक प्रकल्प ओळखला जातो.
- **निलोखेरी प्रकल्प** (1948)
  - ➢ हिंदुस्तानच्या फाळणीमुळे पाकिस्तानातून भारतात आलेल्या निर्वासितांचे पुनर्वसन करण्यासाठी पंजाबमधील कर्नाल जिल्ह्यातील निलोखेरी येथे 1,100 एकर जमिनीवर 7,000 निर्वासितांसाठी स्वयंपूर्ण वसाहती स्थापन करण्यात आल्या.
  - ➢ या प्रकल्पाला मजदूर मंजिल म्हणून देखील ओळखले जाते. श्री. सुशीलकुमार डे यांनी या कार्यक्रमात महत्त्वाची भूमिका बजावली.
- **फिरका विकास प्रकल्प** (1948)
  - ➢ मद्रास प्रांतात हा प्रकल्प राबविण्यात आला. शेती, पशुपालन, पाटबंधारे, उद्योगधंदे इत्यादी क्षेत्रांत योग्य समन्वय साधणे आणि त्यामार्फत ग्रामीण विकासाला चालना देणे, हा या प्रकल्पाचा मूळ उद्देश होता.
  - ➢ काही खेड्यांचा एक गट तयार करून प्रत्येक गटासाठी एक समाजकल्याण अधिकारी नियुक्त करण्यात आला. खेड्यांच्या या प्रत्येक गटाला 'फिरका' हे नाव देण्यात

आले होते.

- सेवाग्राम योजना (1936), गांधीवादी उपक्रम, सर्वोदय कार्यक्रम (1948) हे सर्वच प्रकल्प महात्मा गांधी यांच्या ग्राम स्वराज्य या विचारांवर आधारित होते. या व्यतिरिक्त विल्यम वायजर यांची भारतीय ग्रामसेवा योजना (1945), गांधींचा ग्रामीण संरचनात्मक विकास कार्यक्रम - अंत्योदय कार्यक्रम (1925), बडोदा ग्रामीण पुनर्रचना केंद्र (1932-33) इत्यादी उपक्रम राबविले गेले.
  - ➢ महात्मा गांधींनी विकेंद्रीकरणाचे Model मांडून स्वावलंबी आणि स्वायत्त खेडे हाच व्यवस्थेचा केंद्रबिंदू मानला. आचार्य विनोबा भावे यांनी सर्वोदय चळवळीद्वारा स्थानिक पातळीवरच उत्पादन व वितरणाद्वारे विकेंद्रीकरण साधण्याचे ध्येय ठेवले.
  - ➢ M.N.Roy यांनी लोकसमित्यांद्वारे सत्तेचे परिणामकारक विकेंद्रीकरण करण्याची गरज आहे हे मत मांडले.
  - ➢ पुणे येथील Servants Society of India या संस्थेने ग्रामीण विकासासाठी कृषी व कुटीर उद्योगात प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षण केंद्रे सुरू केली.
  - ➢ 1945 मध्ये स्थापन Indian Village Service तसेच ग्वालियार येथील आदर्श सेवा संघ या संस्थांनी देखील ग्रामीण विकासावर विशेष लक्ष केंद्रित केले.

## स्वांतत्र्योत्तर काळात स्थानिक स्वराज्य संस्था यांचा स्वीकार व ग्रामीण विकास यांसाठी प्रयत्न

### समुदाय विकास कार्यक्रम

- ग्रामीण विकासासाठी व्यापक स्वरुपाचा संपूर्ण देश पातळीवर राबविला गेलेला हा पहिला शासकीय कार्यक्रम होय. यालाच समाजविकास योजना अथवा समुदाय विकास योजना (Community Development Programme) असे देखील म्हटले जाते.
- 2 ऑक्टोबर 1952 या दिवसापासून (म. गांधी जयंती) देशात CDP हा लागू करण्यात आला. या योजनेचे उद्देश -
  - ➢ ग्रामीण भागाचे मागासलेपण दूर करणे.
  - ➢ ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास
  - ➢ पंचवार्षिक योजनेला CDP च्या मार्फत गती प्राप्त करून देणे.
- ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध क्षेत्रे विचारात घेण्यात आली होती. शेती, शिक्षण, आरोग्य, रोजगार, गृहनिर्माण, दळणवळण, व्यवसाय प्रशिक्षण, सामाजिक कल्याण (मनोरंजन, सांस्कृतिक केंद्र) यांसारख्या बाबींवर विशेष लक्ष पुरविण्यात आले होते.
- या कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पुढील पाच स्तरांवर प्रशासकीय यंत्रणा निर्माण करण्यात आली होती.
  - ➢ केंद्रस्तरावर एक केंद्रीय समिती होती. CDP चे मूल्यांकन करण्यासाठी कार्यक्रम मूल्यांकन संघटना निर्माण करण्यात आली होती.
  - ➢ राज्यस्तरावर मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली राज्य विकास समिती स्थापन करण्यात आली होती.
  - ➢ जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक जिल्हा समिती स्थापण्यात आली होती.
  - ➢ विकास गट (तहसील) या स्तरावर गट विकास अधिकारी हा या कार्यक्रमाचा प्रमुख होता.
  - ➢ ग्राम पातळीवर ग्रामसेवक हा BDO च्या मार्गदर्शनाखाली काम पाहत होता.
- CDP ची अंमलबजावणी 55 विकासगटांत सुरू करण्यात आली. (सुरूवातीला 300 गावांचा एक विकासगट होता नंतर 100 गावांचा एक विकासगट या प्रकारे रचना करण्यात आली व सदर कार्यक्रम संपूर्ण देशात राबविण्यात आला). नंतरच्या काळात प्रत्येक विकास गट हा 100 खेडी आणि 1 लाख लोकसंख्या असलेला होता. पुढे CDP ही योजना (IRDP) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमात विलीन करण्यात आली. अपुरे मनुष्यबळ आणि संसाधनांचा अभाव यामुळे CDP ही योजना प्रभावीपणे राबविणे शक्य झाले नाही. CDP करिता आवश्यक निधी भारत सरकार व जनता अशा दोघांकडून उभारला गेला.
- या कार्यक्रमाला तांत्रिक मदत USA कडून मिळाली
- CDP या योजनेला अपेक्षित यश मिळाले नाही. लोकसहभागाची कमतरता, लाल फितीचा कारभार, भ्रष्टाचार, स्वयंसेवेचा अभाव, कार्यक्रमाच्या अंमलबजावणीतील अकार्यक्षमता व सुसूत्रतेचा अभाव इत्यादी बाबींमुळे सदर कार्यक्रम अपयशी ठरला.

### राष्ट्रीय विस्तार सेवा (National Extension Service)

- CDP व NES या दोन्ही कार्यक्रमांचे उद्दिष्ट समान होते. CDP ची सुरूवात झाल्यावर त्याचा विस्तार संपूर्ण देशात करण्यासाठी व कायम स्वरुपाची विस्तार संघटना स्थापन करण्यासाठी NES या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.
- 2 ऑक्टोबर 1953 मध्ये सुरू झालेल्या NES हा कार्यक्रम 3 टप्प्यांत कार्यान्वित झाला.
  - ➢ राष्ट्रीय विस्तार गट

- जोमदार विकास गट
- जोमदार विकासोत्तर गट

- लोकसहभागाचा अभाव, योजना शासकीय पातळीवर मर्यादित राहणे यामुळे योजनेला अपेक्षित यश मिळाले नाही.

## पंचायती राज

- स्वातंत्र्यपूर्व काळात स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत भारतीय नागरिकांना स्वयंशासनाचे अधिकार प्रथमतः मिळाले. स्थानिक स्वराज्य संस्था या लोकशाही शिक्षणाच्या पाठशाळा म्हणून ओळखल्या जातात. सत्तेचे विकेंद्रीकरण करून लोकशाही व्यवस्थेला बळकट करणे व स्थानिकांना राजकीय प्रक्रियेत सामील करून घेणे या उद्देशाने पंचायत राजची स्थापना झाली.
- स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे लोकशाहीच्या यशाची उत्कृष्ट हमी – लॉर्ड ब्राईस
- **बलवंतराय मेहता समिती** – 1957 – CDP (1952) व NES (1953) या दोन योजना अपयशी ठरल्या, या योजनांचा आढावा घेणे, त्यांच्या अपयशाची कारणे शोधणे आणि लोकशाही विकेंद्रीकरणासाठी या समितीची स्थापना करण्यात आली.
  - कनिष्ठ स्तरावर ग्रामपंचायत, मध्यम स्तरावर पंचायत समिती, वरिष्ठ स्तरावर जिल्हा परिषद अशी तीनस्तरीय पंचायत राज यंत्रणेची शिफारस या समितीने केली.
  - स्थानिक स्वराज्य संस्थाचा प्रमुख दर्जा पंचायत समितीला असेल, कारण पंचायत समिती ही जिल्हा परिषद व ग्रामपंचायत या दोन्हींचा समन्वय साधणारा प्रभावी घटक म्हणून काम करेल.
  - बलवंतराव मेहता समितीच्या शिफारशींना तत्कालीन National Development Council (NDC) मार्फत मान्यता देण्यात आली. मात्र, या शिफारशी सर्वच राज्यांना एकसारख्या लागू न करता, प्रत्येक राज्याला त्यांची स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन पंचायत राज संस्थांची राज्य पातळीवर संरचना ठरवण्याचा अधिकार देण्यात आला.
  - 2 ऑक्टोबर 1959 रोजी राजस्थान या राज्याने सर्व प्रथम पंचायतराज व्यवस्थेचा स्वीकार केला.
  - **बलवंतराय मेहता समितीने सुचविलेल्या शिफारशी**
    - ग्रामपंचायतीची स्थापना प्रत्यक्षरीत्या निर्वाचित प्रतिनिधींद्वारे करावी.
    - तर पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेची स्थापना अप्रत्यक्षरीत्या निवडून आलेल्या सदस्यांद्वारे करावी.
    - पंचायत समिती ही कार्यकारी संस्था असावी, तर जिल्हा परिषद ही सल्ला देणारी, समन्वय राखणारी आणि पर्यवेक्षण करणारी संस्था असावी.
    - जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष हा जिल्हा कलेक्टर असावा.
    - या संस्थांना आपले कार्य आणि जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी पुरेसे संसाधन उपलब्ध करून देणे.
- **वसंतराव नाईक समिती**
  - राष्ट्रीय पातळीवर पंचायतराज व्यवस्थेबाबत बलवंतराय मेहता समितीने केलेल्या शिफारशी महाराष्ट्र राज्यात कशा प्रकारे स्वीकारल्या जाव्या यासाठी महाराष्ट्र सरकारने तत्कालीन महसूल मंत्री वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली 1960 मध्ये समिती नेमली. P.G. साळवी हे या समितीचे सचिव होते.
  - बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशींचा अभ्यास करून वसंतराव नाईक समितीने महाराष्ट्रातील पंचायतराज व्यवस्थेसंबंधी शिफारशी केल्या.
  - या समितीच्या प्रमुख शिफारशी –
    - जिल्हा परिषद हाच प्रमुख घटक.
    - तालुका स्तरावर पंचायत समिती व गाव पातळीवर ग्रामपंचायत स्थापन करण्यात यावी.
    - जिल्हा परिषदेला स्वतंत्र IAS अधिकारी; जिल्हा स्तरावरील सर्व विकासकामांची जबाबदारी जिल्हाधिकारी ऐवजी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी याकडे सोपवली जावी.
    - सर्व स्तरांवरील पंचायतराज संस्थांच्या प्रत्यक्ष निवडणुका घेतल्या जातील. तसेच खासदार आणि आमदार यांना पंचायतराज संस्थांवर पदसिद्ध सदस्य म्हणून घेतले जाणार नाही. स्थानिक नेतृत्वाला संधी देण्यात येईल.
  - वसंतराव नाईक समितीच्या शिफारशींनुसार महाराष्ट्र राज्य सरकारने 'महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961' तयार केला. यानुसार 1 मे 1962 पासून राज्यात त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्थेची सुरूवात झाली. पंचायतराज व्यवस्थेची सुरुवात करणारे महाराष्ट्र हे देशातील 9 वे राज्य होय.
  - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 नुसार केवळ जिल्हा परिषद व पंचायत समि

स्थापण्याची तरतूद करण्यात आली आहे.

➢ 1956 मध्ये द्विभाषिक मुंबई राज्याची निर्मिती झाल्यावर राज्यातील ग्रामपंचायतींमध्ये समानता व एकसूत्रता आणण्यासाठी 1958 मध्ये मुंबई ग्रामपंचायत कायदा संमत करण्यात आला. पुढे महाराष्ट्र (Change of Titles of Certain Bombay Act's) कायदा, 2011 नुसार 1 मे 1960 च्या पूर्वलक्ष्यी प्रभावाने या अधिनियमाचे नाव 'महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम' असे बदलण्यात आले.

➢ मुंबई शहर व मुंबई उपनगर हे 2 शहरी जिल्हे वगळता राज्यातील उर्वरित 34 जिल्ह्यांमध्ये पंचायतराज व्यवस्था अस्तित्वात आहे.

- पंचायतराज संस्थांना घटनात्मक दर्जा देण्याची शिफारस सर्वप्रथम सिंघवी समितीने केली. त्यानुसार 73 व्या घटनादुरुस्तीने ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था यांना, तर 74 व्या घटनादुरुस्तीने नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांना घटनात्मक दर्जा देण्यात आला. 1996 मध्ये PESA या कायद्याने आदिवासी भागातील पंचायतराज व्यवस्थेला विशेष अधिकार बहाल करण्यात आले.
- पंचायतराज संस्थांमुळे ग्रामस्तरावर लोकशाहीकरण वाढण्यास मदत झाली आहे. त्याचप्रमाणे शासन, प्रशासन यांच्या ग्रामीण प्रश्न/समस्या संबंधी प्रतिसादामध्ये गतिशीलता, संख्यात्मक, गुणात्मक वाढ झालेली आहे.
- **पंचायतराज व्यवस्थेतील समस्या/मर्यादा**

➢ संसाधनाची कमतरता-पंचायतराज संस्थांना केंद्र/राज्य सरकारच्या विविध योजना राबविण्यासाठीसाठी स्वतःची यंत्रणा व निधी असणे आवश्यक आहे. निधीच्या उपलब्धतेसाठी पंचायतराज संस्थांना केंद्र/राज्य यांच्या साहाय्यावर अवलंबून राहावे लागते.

➢ 73 व 74 व्या घटनादुरुस्तीने समावेश करण्यात आलेले 11 व 12 ही परिशिष्टे केवळ शिफारशींच्या स्वरुपात आहेत. म्हणजे पंचायतराज संस्थांना कोणतेही अधिकार देणे अथवा न देणे हे राज्य सरकारच्या मर्जीवर अवलंबून आहे.

➢ राज्य सरकार कोणत्या कारणांसाठी स्थानिक स्वराज्य संस्था विसर्जित करू शकते, हे कुठेही स्पष्ट देण्यात आलेले नाही.

- महाराष्ट्रातील पंचायतराज व्यवस्था बळकट करण्यासाठी 2000 साली जिल्हा परिषदांच्या अधिकारांत वाढ करण्याचा महत्त्वाचा निर्णय राज्य शासनाने घेतला. यानुसार राज्य सरकारच्या अधिकारांतील 116 योजना जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित करण्यात आल्या.

## भूमी सुधारणा आणि ग्रामीण विकास

### भूमी सुधारणा

- मराठेशाहीमध्ये इनाम, वतन व मिरास हे शब्द जमिनीच्या महसूल आकारणीशी निगडित होते.
- शिवाजी राजेंच्या काळात 1674 पासून जमीन महसूल आकारणीसाठी खेडे हे एकक वापरले जात असे. पीक उत्पादन करणाऱ्यांची क्षमता पाहून कर आकारणी (शेतसारा) बसवला जाई. या पद्धतीला 'कमालधारा' म्हटले जाई. प्रत्येक गावात मामलेदार हे देशमुख, देशपांडे यांचे मदतीने महसूल गोळा करत. दुसऱ्या बाजीरावच्या (1796 ते 1818) काळात ही पद्धत बंद झाली. पुण्याच्या उत्तरेस भीमा नदीपासून तापी नदीकाठच्या बऱ्हाणपूरपर्यंत विस्तृत प्रदेश नकाशात बसविला. यादरम्यान नाशिक शहराचा नकाशा सर्वप्रथम करण्यात आला. ब्रिटिशांनी सन 1767 मध्ये सर्व्हे ऑफ इंडियाची (Survey of India) स्थापना केली. सर्व्हेअर जनरल म्हणून जेम्स रनेल यांची नियुक्ती झाली. जेम्स रनेल लिखित बेंगॉल ॲटलास (Bengals Atlas) या पुस्तकात शंखू साखळीने जमिनीची मापे आणि खगोलशास्त्रीय माहिती याचा एकत्रित आधार घेऊन नकाशा तयार केल्याचा उल्लेख आहे.
- सर लॅम्प्टन यांनी दक्षिण भारतात केपकामोरिन येथून 1802 मध्ये त्रिकोणमितीय भूमापनाची सुरुवात केली. सर लॅम्प्टन यांच्या मृत्यूनंतर जॉर्ज एव्हरेस्ट यांनी भारतीय भूखंडाचे मोजणीचे काम चालू केले व 33 वर्षांत पूर्ण केले. जॉर्ज एव्हरेस्ट यांनी एव्हरेस्ट शिखराची उंची मोजली म्हणून त्याला एव्हरेस्ट हे नाव पडले. 1818 साली एल्फिन्स्टन यांनी रयतवारी पद्धतीचा पाया घातला. ब्रिटिशांच्या कारकिर्दीची दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे शेत जमिनीची शास्त्रशुद्ध पद्धतीने श्री. गुंटर नावाच्या अधिकाऱ्याने अमलात आणलेल्या शंखू साखळीने मोजणी करण्यात आली. म्हणून शंखू साखळीस गुंटर चेन, गुंठा असे म्हणत सदर साखळी 33 फूट लांबीची असून 16 भागात विभागली आहे.
- देशातील भूमी सुधारणा कार्यक्रमाचा अर्थ आपणांस दोन प्रकारे लावता येतो, संकुचित आणि व्यापक/विस्तृत.
- व्यापक अर्थाने जमीन सुधारणा म्हणजे जमीन व्यवस्थेच्या

संरचनात्मक परिवर्तनासाठीचे प्रयत्न होय. यामध्ये जमिनीची मालकी, कुळ पद्धती याच्याशी संबंधित सर्व प्रकारच्या बदलांचा समावेश होतो.

- संकुचित अर्थाने भूमी सुधारणा म्हणजे शेतकरी तसेच भूमिहीन शेतमजूर यांच्या हितासाठी शेतजमिनीच्या मालकीचे पुनर्वितरण करणे होय. म्हणजेच मोठ्या जमीनदारांकडून अतिरिक्त जमीन सरकारने काढून घेऊन तिचे वाटप छोटे शेतकरी आणि भूमिहीन शेतमजुरांमध्ये करण्याच्या प्रक्रियेला भूमी सुधारणा म्हणतात.
- ज्या देशात सरंजामशाही असते तेथे प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्या वर्गाला उत्पादनाच्या प्रेरणा उपलब्ध नसतात. कारण त्यांनी केलेल्या मेहनतीचे फळ प्रत्यक्षात त्यांना मिळत नाही.
- भूमी सुधारणांचा प्राथमिक उद्देश जरी जमिनीच्या मालकीची व्यवस्था सामाजिकदृष्ट्या न्याय्य व आर्थिकदृष्ट्या प्रभावी पद्धतीने प्रस्थापित करणे असा असला तरी, त्यामध्ये शेतजमिनींचे संकलन, भूधारणा पद्धतीतील बदल, कूळ वहिवाट पद्धती, धारण क्षेत्रांचा आकार इत्यादी बाबींचा समावेश होतो.
- जमिनीच्या पुनर्वाटपामुळे जमिनीचे एकत्रीकरण होऊन तुकडे जोडीचे (चकबंदीचे) धोरण साध्य होईल.
- कृषी सुधारणा यांच्या व्याख्येत भूमी-सुधारणासोबतच कृषी पद्धतींचे आधुनिकीकरण आणि शेतजमिनीवर अवलंबून असलेल्या सर्व लोकसंख्येच्या जीवनमानात सुधारणेसाठी आवश्यक उपायांचा समावेश होतो.
- 1765 मध्ये सर्वप्रथम ब्रिटिश सरकारने ईस्ट इंडिया कंपनीला बंगाल, बिहार, ओडिशा प्रांताचे कर गोळा करण्यासंबंधीचे दिवाणी अधिकार बहाल केले. ईस्ट इंडिया कंपनीच्या आयात निर्यातींवरील कर लादण्याच्या अनिर्बंध अधिकारावर ब्रिटिश सरकारने बंधने घातली होती. म्हणून जमीन महसूल (कर) हा कंपनीच्या उत्पन्नाचा महत्त्वाचा घटक होता. पुढे 1773 मध्ये वॉरन हेस्टिंग्जने सर्वाधिक बोली लावणाऱ्यास 5 वर्षे मुदतीसाठी कर गोळा करण्याचे अधिकार देण्यात आले.
- 1793 मध्ये बंगाल व बिहार प्रांतांत लॉर्ड कॉर्नवॉलिस याने कायमधारा पद्धत लागू केली. (जमीन कर वसूल करण्याचा कायमस्वरुपी अधिकार) या पद्धतीत जमीनदारांना जमिनीचे मालक समजण्यात आले व या जमीन मालकीचे हक्क वारसा हक्कानुसार हस्तांतरणीय होते.
- 1792 मध्ये सर थॉमस मुन्रो यांनी मद्रास प्रांतात रयतवारी पद्धत अंमलात आणली. पुढे मुंबई प्रांतात व मध्य प्रांतात देखील रयतवारी पद्धतीचा स्वीकार करण्यात आला.
- पंजाब, अवध, आग्रा या भागात हॉल्ट मॅकेन्झी याने महालवारी पद्धत लागू केली. 1833 मध्ये तत्कालीन गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेंटिकने महालवारी पद्धतीला पाठिंबा दिला.
- 1859 : बंगाल रेंट ॲक्टअंतर्गत सलग 12 वर्षे जमीन कसणाऱ्या कुळांना जमिनीची मालकी मिळाली.
- जमीन महसुलाच्या देशाच्या विविध भागांत वेगवेगळ्या पद्धती जरी अस्तित्वात असल्या तरी कालांतराने त्यांची वैशिष्ट्ये परस्परांत मिसळून गेली. जमीनदारी पद्धती बंद करण्यासाठी बंगाल कर आयोग (1940) (फ्लाऊड आयोग) स्थापन करण्यात आला.
- ब्रिटिश काळात जमीनदारी पद्धतीला मोठा आधार मिळाला. सरंजामदार, जहागीरदार, वतनदार, जमीनदार यांना प्रतिष्ठा लाभली. मात्र, प्रत्यक्षात जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांना कुळ म्हणून राहावे लागले. स्वातंत्र्योत्तर काळात कुळांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी आणि त्यांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी जमीनविषयक सुधारणांची गरज निर्माण झाली. 1949 मध्ये J.C कुमारप्पा यांच्या अध्यक्षतेखाली शेतकी सुधारणा समिती स्थापन करण्यात आली.

**भारतातील भूमी सुधारणांची उद्दिष्टे खालीलप्रमाणे :**

- शेती व्यवसायातून जमीनदार, वतनदार, जहागीरदार इत्यादी मध्यस्थांचे उच्चाटन करणे. 'कसेल त्याची जमीन' हे उद्दिष्ट प्रत्यक्षात आणणे.
- कुळांच्या हितसंबंधांचे रक्षण करणे, त्यांना संरक्षण देण्यासाठी कूळपद्धतीमध्ये आवश्यक त्या सुधारणा करणे.
- एका व्यक्तीची अथवा कुटुंबाच्या मालकीची कमाल किती जमीन असावी ती मर्यादा ठरवून देणे.
- जमिनीचे विभाजन (Sub-Division) आणि तुकडीकरण (Fragmentation) थांबविणे आणि तुकडे बंदीसारखे उपा योजणे म्हणजेच कृषी पुनर्संघटन होय.
- भूमिहीन शेतमजुरांना जमिनीची मालकी मिळवून दे कुळांच्या खंडाच्या दराचे नियमन, भूधृतीची सुरक्षा.
- कृषी क्षेत्रात सहकारीकरणाचा अवलंब करणे.
- भूमी अभिलेखाचे अद्ययावतीकरण.

वरील सर्व बाबींवरून असे दिसते की, भू-सुधारणांचा केवळ जमिनीच्या मालकी हक्कांचे पुनर्वितरण नसून शेती एकंदरीत विकासासाठी पोषक संरचना निर्माण करणे, हा

- आंबेडकरांची 125 वी जयंती 14 April 2016 होती, त्यामुळे 14 April ते 24 April (पंचायत राजदिन) 2016 या दरम्यान हे अभियान पंचायत राज मंत्रालयाने राबवले.
- प्रमुख उद्देश
  - ➢ सामाजिक सलोखा व अभिसरण वाढवणे
  - ➢ पंचायतराज संस्थांचे बळकटीकरण
  - ➢ शेतकऱ्यांचा विकास
  - ➢ गरिबांचे जीवनमान उंचावणे

## स्मार्ट दलित गाव

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या जयंतीनिमित्त (14 April2016) राज्यात प्रत्येक जिल्ह्यात एक स्मार्ट दलित गाव समाजकल्याण मंत्रालयामार्फत उभारले जाणार आहे.
- राज्यात 70% पेक्षा जास्त दलित समाजातील नागरिकांची संख्या असलेली अनेक गावे आहेत. अशा गावांपैकी प्रत्येक जिल्ह्यातील एक गाव निवडून ते स्मार्ट करण्यासाठी सरकार मदत करणार आहे.
- ही योजना यशस्वी झाल्यानंतर तालुक्यातील एका गावाची त्यासाठी निवड करण्यात येईल. विशेष म्हणजे स्मार्ट गावांतून एका गावाची राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड केली जाईल.
- गावात सवर्ण-दलित यांमध्ये सलोख्याचे वातावरण निर्माण करणे तसेच गावात पाणी, रस्ते, वीज, अभ्यासिका, समाजमंदीर इ सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातील.

## यशवंत पंचायत राज अभियान

- राज्यात पंचायत राज संस्थामधून प्रशासकीय व्यवस्थापन व विकास कार्यात उत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायतींसाठी 2005-06 पासून विभाग व राज्य अशा दोन्ही स्तरांवर यशवंत पंचायत राज अभियान सुरू करण्यात आले.
- राज्यात चालू असलेल्या यशवंत पंचायत राज अभियानाच्या धर्तीवर देशपातळीवर पंचायत राज मंत्रालयाने पंचायत राज व्यवस्थेच्या सक्षमीकरणासाठी काम करणाऱ्या राज्यांना तसेच पंचायत राज संस्थाना प्रोत्साहन देण्यासाठी सन 2011-12 पासून पंचायत सबलीकरण आणि उत्तरदायित्व प्रोत्साहन योजना सुरू केली आहे.
- महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाने सुरू केलेली यशवंत पंचायत राज अभियान व केंद्र सरकारच्या पंचायतराज मंत्रालयाने सूरु केलेली पंचायत सबलीकरण आणि उत्तरदायित्व प्रोत्साहन योजना यांचा उद्देश एकच असल्याने दोन्ही योजना एकत्रितपणे राबविण्यात येत आहे.
- अभियानाचा उद्देश
  - ➢ घटनेच्या 9 व्या भागातील कलम 243 G नुसार पंचायतराज संस्थाना प्रदानीकरणाद्वारे निधी (Fund) कार्य (Functions) मनुष्यबळ सक्षम करण्यासाठी राज्यांना प्रोत्साहन देणे.
  - ➢ पंचायत राज संस्थांच्या कार्यपद्धतीमध्ये पारदर्शकता आणि कार्यक्षमता येण्यासाठी उत्तरदायी पद्धती अमलात आणण्यासाठी प्रोत्साहन देणे.
  - ➢ या दोन्ही योजनांतर्गत पंचायत राज संस्थाचे अचूकपणे मूल्यांकन केले जाते. मूल्यमापन करताना पंचायत राज संस्थाची कामगिरी सूक्ष्मपणे तपासली जाते.
  - ➢ यशवंत पंचायत राज अभियानात राज्यातील उत्कृष्ट 3 ZP , 3 पंचायत समित्या, 3 ग्रामपंचायती यांना राज्यस्तरावर तर तीन पंचायत समित्या व तीन ग्रामपंचायतींना विभागस्तरावर पुरस्कार देण्यात येतात.
  - ➢ सध्या ही योजना राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियानाचा उपघटक आहे.

## राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान

- 7 मार्च 2013 पासून हा केंद्रपुरस्कृत कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे.
- केंद्र शासनाने पंचायत राज संस्थांना सक्षम करण्यासाठी 11 व्या पंचवार्षिक योजनेत काही योजना सुरू केल्या
  - ➢ राष्ट्रीय ग्रामस्वराज्य योजना
  - ➢ पंचायत महिलाशक्ती अभियान
  - ➢ पंचायत सशक्तीकरण व उत्तरदायित्व प्रोत्साहन योजना
- पंचायत राज व्यवस्थेला आणखी बळकट करण्यासाठी वरील सर्व कार्यक्रम व योजना यांचे एकत्रीकरण करून राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान हा कार्यक्रम हाती घेतला आहे.
- जी राज्ये/केंद्रशासित प्रदेश घटनेच्या 9 व्या कलम अंतर्गत समाविष्ट नाही अशा ठिकाणी ही योजना लागू आहे.
- या कार्यक्रमात 20% पेक्षा अधिक निधी हस्तांतरण आणि जबाबदारीच्या दृष्टीने राज्यांच्या कामगिरीशी संबधित आहे.
- खर्चाचा केंद्र:राज्य वाटा 75:25 असा आहे.

## राष्ट्रीय ग्राम स्वराज्य योजना

- 6 Dec 2010 रोजी ही केंद्रपुरस्कृत योजना सुरू झाली.
- पंचायत राज संस्थामधील निर्वाचित प्रतिनिधी व अधिकारी/कर्मचारी यांना त्यांचे हक्क, कर्तव्य व जबाबदाऱ्या उत्तमरीत्या पार पाडण्यासाठी तसेच विविध शासकीय योजनांची माहिती

करून देण्यासाठी त्यांच्या प्रशिक्षणाचा व क्षमता बांधणीचा कार्यक्रम राबवणे हा या योजनेचा मूळ उद्देश होता.

- सदर योजना आता राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियानाचा भाग बनली आहे.

### पंचायत महिला शक्ती अभियान

- पंचायत राज संस्थामध्ये निवडून आलेल्या महिला लोकप्रतिनिधींना लोकशाही तत्त्वाविषयी जागृती निर्माण करणे, त्यांना कामकाजाबाबतचे प्रशिक्षण देणे आणि त्यांच्या समस्यांचे निराकरण करणे यासाठी एक व्यासपीठ म्हणून पंचायत राज मंत्रालयाने सन 2007 पासून पंचायत महिला शक्ती अभियान हा कार्यक्रम सुरू केला.
- पंचायत महिला शक्ती अभियानांतर्गत नागपूर येथे राज्य साहाय्य केंद्र स्थापन करण्यात आले आहे.
- सध्या ही योजना राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियानांतर्गत राबवण्यात येते.

### संग्राम प्रकल्प

- NeGP (National e Governance Programme) या कार्यक्रमांतर्गत देशातील सर्व पंचायतराज संस्थाचे संगणकीकरण करण्यासाठी ePRI(e-Panchayat Raj Institution) हा मिशन मोड कार्यक्रम हाती घेतला गेला.
- त्यानुसार महाराष्ट्रातील सर्व पंचायत राज संस्थांचे संगणकीकरण करुन त्यांचा कारभार ऑनलाईन करण्याचा महत्त्वाकांक्षी संग्राम (संगणकीय ग्रामीण महाराष्ट्र) हा प्रकल्प राबविण्यास 1 May 2011 पासून सुरुवात झाली.
- या संग्राम केंद्राकडून गावपातळीवर आर्थिक समावेशन याचे देखील काम केले जाते. त्यामार्फत बँकेच्या सर्व सुविधा गावातील लोकांना या केंद्रामार्फत पुरवल्या जातात.
- राज्यातील Internet सुविधा असलेल्या संग्राम केंद्रांना महा-ई-सेवा केंद्राचा दर्जा देण्यात आला आहे.
- या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी महाऑनलाईन (महाराष्ट्र शासन व TCS ) याची स्थापना करण्यात आली आहे.

### PRIA - Soft

- पंचायतराज संस्थांचे लेखे ठेवण्यासाठी हे नवे Software विकसित करण्यात आले आहे.
- यात जमा-खर्च व्यवहारासंबधातील नोंदी केल्यावर कॅशबुक, उपयोगिता प्रमाणपत्रे, इतर वित्तीय माहितीबाबतचे सर्वंकष अहवाल तयार होतात.
- 2010-11 या आर्थिक वर्षापासून याची अंमलबजावणी सुरू झाली, त्यामुळे पंचायत राज संस्थाकडे हस्तांतरित होणाऱ्या निधीवर व त्याच्या वापरावर राज्यस्तरावरून देखरेख व नियंत्रण ठेवता येणे शक्य होणार आहे.

### मागास क्षेत्र अनुदान निधी योजना (BRGF - Backward Region Grant Funding)

- 2007-2008 मध्ये सुरू झालेल्या 100% केंद्रपुरस्कृत योजनेचा मूळ उद्देश प्रादेशिक असमतोल दूर करणे व स्थानिक पायाभूत सुविधामधील कच्चे दुवे जोडणे हा आहे.
- केंद्र शासनामार्फत राज्यातील 12 मागास जिल्ह्यांचा समावेश या योजनेत केला होता. मात्र सध्या ही योजना बंद झाली आहे.

### ग्रामविकास विभागअंतर्गत e-Governance अंतर्गत राबवण्यात येत असलेले विविध उपक्रम

- शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या online बदल्या, त्यामुळे बदल्यामधील राजकीय हस्तक्षेप व वशिलेबाजी यांवर नियंत्रण आले आहे.
- राज्यातील सर्वच शाळांमध्ये शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी Biometric Attendence System
- राज्यातील पंचायत राज संस्थांमधील विविध विकास योजनांतर्गत बांधकाम, साहित्य खरेदी, सेवा पुरवठा यासाठी 1 Jan 2012 पासून ई-निविदा या प्रक्रियेतून राबविण्यास सुरुवात झाली. त्यामुळे या प्रक्रियेत सुटसुटीतपणा, पारदर्शकता व वेळेची बचत होण्यात मदत झाली आहे.

### पर्यावरणसंतुलित समृद्ध ग्राम योजना

- महाराष्ट्र शासनाने ही योजना 2010 पासून लागू केली.
- योजनेचे उद्देश
  - ➢ गावाच्या विकासाच्या जोडीने पर्यावरण संवर्धन, जतन व संरक्षण करणे.
  - ➢ गावाचा विकास व पर्यावरण संरक्षणात लोकसहभाग वाढवणे.
  - ➢ ग्रामीण विकासाच्या विविध योजनांमध्ये समन्वय साधणे.
  - ➢ गावात शहराप्रमाणे उच्च प्रतिच्या भौतिक सुविधांची निर्मिती करून लोकांचे जीवनमान उंचावणे.
- या योजनेत सहभागी झालेल्या ग्रामपंचायतींचे प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या निकषाच्या आधारे मूल्यमापन करण्यात येते. निकष पूर्ण करणाऱ्या ग्रामपंचायतींना लोकसंख्येच्या आधारावर 3 वर्षे अनुदान देण्यात येते.
- Performance based grants to grampanchayat असे या योजनेचे स्वरूप होते. Eco Village ची संकल्पना राबवून समृद्ध ग्राम निर्माण करणे.

- या योजनेतील 9 निकष पुढीलप्रमाणे
  (1) वृक्षारोपण
  (2) निर्मलग्राम
  (3) करवसुली
  (4) प्रदूषण
  (5) संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान
  (6) यशवंत पंचायतराज अभियान
  (7) अपारंपरिक ऊर्जा
  (8) घनकचरा व्यवस्थापन
  (9) सांडपाणी व्यवस्थापन

## स्मार्ट ग्राम योजना

- 2010-11 पासून राबविण्यात येत असलेल्या पर्यावरणसंतुलित समृद्ध ग्राम योजनेच्या स्वरुपात व निकषात बदल करण्यात येऊन SMART Gram ही नवी योजना Nov 2016 पासून राज्यशासनाने सुरू केली.
- SMART
  - ➤ Sanitation (स्वच्छता)
  - ➤ Management (व्यवस्थापन)
  - ➤ Accountability (दायित्व)
  - ➤ Renewable Energy Environment (अपारंपरिक ऊर्जा आणि पर्यावरण)
  - ➤ Technolgoy Transparency (तंत्रज्ञान व पारदर्शकता)
- SMART या आधारावर गुणांकन पद्धत आधारित असून याकरिता 100 गुण ठेवण्यात आले आहे.
- **योजनेची उद्दिष्टे**
  - ➤ स्मार्ट ग्रामयोजनेत सर्व जिल्हे, सर्व तालुके, सर्व गावे यांना सहभागाची समान संधी व त्यांना विकासात्मक कामांसाठी प्रोत्साहित करणे.
  - ➤ केंद्र-राज्य शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे. गावागावांत स्पर्धा निर्माण होऊन ग्रामपंचायतीला स्वयंवृद्धीसाठी प्रोत्साहन देणे.
  - ➤ स्मार्ट ग्राम पुरस्कार हे नावीन्यपूर्ण उपक्रम राबवणाऱ्या ग्रामपंचायतींना देणे.
  - ➤ स्मार्ट ग्रामपंचायत इतर सर्व ग्रामपंचायतींना आदर्श व मार्गदर्शक ठरेल व सदर स्मार्ट ग्रामपंचायतीचे अनुकरण इतर ग्रामपंचायतींनी करण्यासाठी त्यांना प्रेरित करणे.
- स्मार्ट ग्राम योजनेंतर्गत स्पर्धा तालुका व जिल्हा पातळीवर होणार आहे. तालुका व जिल्हा पातळीवर सर्वोच्च गुण मिळवणारी ग्रामपंचायत स्मार्ट ग्राम म्हणून निवडली जाणार आहे.
- प्रथम स्तर स्पर्धेत म्हणजे तालुका स्तरावर अंतिम निवड झालेल्या स्मार्ट ग्रामपंचायतींना 26 Jan या दिवशी 10 लाख रु इतके पारितोषिक देण्यात येते.
- द्वितीय स्तर स्पर्धेत म्हणजे जिल्हा स्तरावर अंतिम निवड झालेल्या स्मार्ट ग्रामपंचायतींना 1 May या दिवशी 40 लाख इतके पारितोषिक देण्यात येते.

## तीर्थक्षेत्र विकास योजना

- महाराष्ट्र शासनाने ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांचा विकास करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान देण्याची योजना सुरू केली.
- ग्रामीण तीर्थक्षेत्रांची वर्गवारी 3 प्रकारांत केली जाते.
  (1) 'अ' वर्ग : राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय महत्त्वाची ठिकाणे आणि ज्यासाठी केंद्र शासन तसेच इतर राष्ट्रांकडून साहाय्यक अनुदान प्राप्त होते. ज्या तीर्थक्षेत्रांना वार्षिक 10-15 लाख भाविक वर्षभरात भेट देतात त्यांना 'अ' वर्ग दर्जा देण्यात आला आहे.
  (2) 'ब' वर्ग : राज्य शासनाने प्रधानसचिव (ग्रामविकास) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. ज्या तीर्थक्षेत्रांना वार्षिक 4 लाख भाविक भेट देतात. तेथे राज्य सरकार 2 कोटी इतका निधी देते.
  (3) 'क' वर्ग : जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा नियोजन व विकास समिती 30 लाख पर्यंत निधी देते. स्थानिक पातळीवरील प्रसिद्ध असलेली तीर्थक्षेत्र जेथे वार्षिक 1 लाख भाविक भेट देतात.
- या योजनेंतर्गत तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी रस्ते, पाणी, दिवे, स्वच्छतागृह, शौचालय, वाहनतळ, भक्तनिवास संरक्षक भिंत इत्यादी सुविधा निर्माण केल्या जातात.
- तीर्थक्षेत्रांच्या विकासकामांबाबत सविस्तर शासननिर्णय 16 Nov 2012 रोजी पारित करण्यात आला.

## संत तुकाराम वनग्राम योजना

- महाराष्ट्र शासनाने लोकसहभागातून वनांचे व्यवस्थापन करण्यासाठी संत तुकाराम वनग्राम योजना 2006-07 मध्ये सुरू केली.
- वनक्षेत्राच्या सीमेवर असणाऱ्या गावांमध्ये संयुक्त वन व्यवस्थापन समितीची स्थापना करणे.
- वनांचे संरक्षण, वृक्षतोड थांबविणे, वनांमध्ये होणारे अतिक्रमण रोखणे, अवैध चराईस आळा घालणे.
- संत तुकाराम वनग्राम उत्कृष्ट संयुक्त वन व्यवस्थापन समिती पुरस्कार

➢ या स्पर्धेत ज्या संयुक्त वन व्यवस्थापन समिती सहभागी होतील त्यातून जिल्हास्तरावर तीन व राज्य स्तरावर तीन समित्यांना हा पुरस्कार देण्यात येईल.

### वनयुक्त शिवार

- जलयुक्त शिवार या योजनेच्या धर्तीवर राज्यात लोकसहभागाच्या माध्यमातून वनयुक्त शिवार ही योजना 1 July 2016 पासून लागू करण्यात आली.
- 'एकच लक्ष, दोन कोटी वृक्ष' या घोषवाक्याला अनुसरुन 1 July पासून 2 कोटी वृक्षलागवड केली जाईल.
- वृक्षतोड व चोरीची माहिती देणाऱ्यांना बक्षीस देण्यात येईल.
- या योजनेसाठी रेल्वे, संरक्षण, केंद्रीय रस्ते वाहतूक आणि दळणवळण या खात्यांची मदत घेतली जाईल. राज्यातील रेल्वेच्या 5,000 मालमत्ता आहेत त्या जागांवर तसेच राष्ट्रीय महामार्गाच्या 500 km दुतर्फा झाडे लावण्यात येतील.
- या योजनेत लावण्यात आलेल्या झाडांचे जतन व संरक्षण व्हावे यासाठी प्रत्येक 1000 झाडांमागे एका व्यक्तीची नियुक्ती करून त्याला मानधनही दिले जाईल. सामाजिक संस्था व बचत गटातील महिलांना देखील ही कामे दिली जातील.

### Lab To Land उपक्रम

- पंचायत राज संस्थांमार्फत विविध उपक्रम आणि योजना राबवल्या जातात. या विकासकामांची माहिती गावपातळीवर प्रत्येक घरांपर्यंत पोहचवण्यासाठी हा Lab to Land उपक्रम राबवत आहे. भारतनिर्माण स्वयंसेवक हे या उपक्रमात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत.

### महाराजस्व अभियान

- महसूल प्रशासन लोकाभिमुख, गतिमान, सुलभ होण्यासाठी व सामान्य जनतेचे प्रश्न त्वरित निकाली काढण्यासाठी राज्यात 1 May 2011 पासून सर्व जिल्ह्यात सुवर्णजयंती राजस्व अभियान लागू करण्यात आले.
- सुवर्ण जयंती राजस्व अभियानात काही नव्या लोकाभिमुख व प्रशासकीय घटकांचा समावेश करून महाराजस्व अभियान 1 Aug 2015 पासून राबविण्यात येत आहे.
- 1995-96 मध्ये RIDF हा 2000 कोटी होता तर 2017-18 मध्ये हा निधी 25000 कोटी इतका करण्यात आला आहे.

### ग्रामीण पायाभूत विकास निधी (RIDF)

- 1995-96 च्या अर्थसंकल्पामध्ये 15 मार्च 1995 रोजी नाबार्ड अंतर्गत RIDF (Rural Infrastructure Development Fund) हा निधी स्थापन करण्यात आला.
- सदर निधीचा उद्देश हा राज्ये व राज्यांतर्गत महामंडळांना ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांचे लहान व मध्यम स्वरूपाचे चालू प्रकल्प (On going Projects) इत्यादींना तातडीने पूर्ण करण्यासाठी अर्थसाहाय्य करणे हा आहे.
- प्रकल्पांच्या किमतीच्या 80% कर्जसाहाय्य देण्यात येते तर 20% शासन सहभाग असतो.
- 1995-96 मध्ये RIDF हा 2000 कोटी होता तर 2017-18 मध्ये हा निधी 25000 कोटी इतका करण्यात आला आहे.

### ग्रामविकास विभाग – Zero Pendency

- ग्रामविकास विभागातील प्रत्येक अधिकाऱ्याच्या कामात दक्षतेने व जलद निपटारा करण्यासाठी ग्रामपंचायत ते मंत्री स्तरापर्यंत प्रत्येक महिन्याच्या 3 ऱ्या शनिवारी प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन ते कोणत्या कारणासाठी प्रलंबित आहे या बाबतची माहिती लगतच्या वरिष्ठ अधिकाऱ्याला सादर करायची व अशा प्रकरणांची यादी कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात येईल.

## पाणीपुरवठा व पेयजल

- ग्रामीण पेयजल पुरवठा हा राज्यसूचीतील विषय आहे. तसेच त्याचा समावेश 11 व्या अनुसूचीमध्ये करण्यात आला. त्यामुळे त्याची जबाबदारी पंचायत राज संस्थांकडे दिली जाऊ शकते.
- जलस्त्रोतांबाबतचे नियोजन व समन्वयन कार्य जलसंधारण मंत्रालयांतर्गत येते. पेयजल व स्वच्छता कार्यक्रमांचे नियोजन पेयजल व स्वच्छता मंत्रालय करते.
- WHO चा अहवाल : Valuing Water Valuing Livelihoods
- UN - Water संस्थेच्या अहवालानुसार जगातील 6 व्यक्तींमागे एका व्यक्तीला प्यायलाही पाणी नाही.
- ग्रामीण पेयजल पुरवठ्यासंदर्भात समस्या
  - ➢ पाण्याचे नवे स्रोत शोधण्याबाबत प्रशासनाची अनास्था
  - ➢ उन्हाळ्यात पाण्याची तीव्र टंचाई
  - ➢ पिण्याच्या पाण्यातील लोह, क्षार, आर्सेनिक फ्ल्युरॉईड, नायट्रेट यांचे प्रमाण व त्यामुळे पिण्याच्या पाण्याचे प्रदूषण

- जुन्या निकषांनुसार प्रतिव्यक्ती प्रतिदिन 40 लिटर पाण्याची नमूद होती. आता नव्या निकषांनुसार प्रतिव्यक्ती प्रतिदिन (Litres per capita per day - LPCD) 55 लिटर पाण्याची गरज नमूद करण्यात आली आहे.
- सध्याच्या पाणीपुरवठा योजनांचा प्रमुख उद्देश-ग्रामीण भागाला 0.5 km अंतराच्या आत 55 लिटर प्रतिव्यक्ती प्रतिदिन पाणी पुरविणे हा आहे.
- LPCD-Litres Per Capita per Day अंतर्गत नवे निकष

| | |
|---|---|
| पेयजल | 3 लिटर |
| स्वयंपाकासाठी | 5 लिटर |
| आंघोळ | 15 लिटर |
| भांडी-धुणे | 10 लिटर |
| कपडे-धुणे | 12 लिटर |
| प्रात: विधीसाठी | 10 लिटर |
| एकूण | 55 लिटर |

- महाराष्ट्रात पाणीपुरवठा व स्वच्छता यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण 1997 मध्ये स्थापन करण्यात आले आहे. याची मुख्यालये मुंबई व नवी मुंबई येथे आहेत.
- राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम ही केंद्रपुरस्कृत योजना असून ती Core योजना या गटात येते. त्यामुळे केंद्र राज्य यांचा खर्चातील वाटा 60:40 असा आहे.
- भारतामध्ये 1981-1991 हे दशक 'जल दशक' म्हणून राबविले गेले, तसेच केंद्र सरकारने 1987 मध्ये राष्ट्रीय जलनीती जाहीर केली.
- पेयजल व स्वच्छ भारत मिशन हा राष्ट्रीय विकास अजेंडाचा एक घटक आहे.
- Vision 2022 अंतर्गत प्रत्येक कुटुंबाला स्वच्छ पेयजल आणि शौचालय सुविधा पुरवणे हे ध्येय ठरवण्यात आले आहे.
- UN मार्फत 22 मार्च जागतिक जलदिन म्हणून साजरा करण्यात येतो. तसेच 2013 हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय जल-सहकाराचे वर्ष' म्हणून साजरे करण्यात आले.
- 2022 पर्यंत सर्वांना स्वच्छ पेयजल पुरवण्यासाठी सन 2015-16 मध्ये ग्रामीण पेयजल व स्वच्छता मंत्रालयाने एक धोरणात्मक आराखडा मांडला. यांमध्ये खालील बाबी नमूद केल्या आहेत :
  - पंचायत राज संस्थांना 100% जलस्रोतांचे व्यवस्थापन करण्यासाठी आर्थिक मदत व वातावरण निर्माण करणे.
  - ग्रामीण भागात नळाने पाणी मिळणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण 90% करणे. त्यांपैकी घरगुती नळजोडणी असलेल्या कुटुंबांचे प्रमाण 80% करणे.
  - प्रत्येक ग्रामीण व्यक्तीला घरात अथवा 50 मीटर परिघाच्या आत 70 लिटर पाणी उपलब्ध करून देणे.
  - प्रत्येक ग्रामीण व्यक्तीला पिणे, स्वयंपाक, घरगुती वापर, पाळीव प्राण्यांसाठी वर्षभर पुरेल असा सुरक्षित पाणीपुरवठा करणे.
- **पाणीपुरवठा साठी केंद्रसरकारचे प्राथमिक प्रयत्न**
  - 1954 मध्ये सर्वप्रथम केंद्रसरकारने ग्रामीण भागातील लोकांना कमी अंतरावर पेयजल उपलब्ध व्हावे यासाठी 'ग्रामीण जलपुरवठा योजना' सुरू केली.
  - तसेच '20 कलमी कार्यक्रम' आणि 'राष्ट्रीय किमान गरजा कार्यक्रमात' केंद्र सरकारने पिण्याच्या पाणीपुरवठा कार्यक्रमास अत्युच्च प्राधान्य दिले.
  - 1948 मध्ये पर्यावरण स्वच्छता समिती (भोरे समिती) ने पुढील 40 वर्षात 90% जनतेला शुद्ध पेयजल पुरविण्याची शिफारस केली.
  - 2002 मध्ये 1987 च्या राष्ट्रीय जलनीतीचे पुनरावलोन करण्यात येऊन 'स्रोतरहित खेडे' यांना प्राधान्य देण्यात आले.
  - 2000 मधील MGD नुसार 1990 मध्ये ज्या लोकांना पेयजल व स्वच्छता उपलब्धता नव्हती त्यांचे प्रमाण 2015 पर्यंत 50% नी कमी करण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले.
  - 1999 मध्ये स्थापित पेयजल पुरवठा विभागाचे नाव पेयजल पुरवठा व स्वच्छता विभाग असे 2010 मध्ये करण्यात आले. पुढे 2011 मध्ये स्वतंत्र पेयजल पुरवठा व स्वच्छता मंत्रालय स्थापन करण्यात आले.
  - अर्सेनिक, फ्ल्युरॉईड, लोह, क्षार, नायट्रेट या पाच प्रदूषकांमुळे पाण्याची गुणवत्ता दूषित होते. 2017-18 अर्थसंकल्पात 28000 अर्सेनिक व फ्ल्युरॉईडबाधित गावापर्यंत पुढील 4 वर्षांत स्वच्छ पेयजल पुरवण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.
  - भारतात सर्वाधिक प्रदूषित जल 'लोह' या घटकामुळे होते.
  - India Mark - II या हातपंप तंत्रज्ञानाचा वापर भूगर्भीय जलाचा पेयजल म्हणून वापर करण्यासाठी केला जात आहे.
  - 'जलमणी योजना' ही 100% केंद्रपुरस्कृत असून दुष्काळी प्रदेशातील शाळांमध्ये जलशुद्धीकरण यंत्रणा बसविण्यासाठी प्रत्येक शाळेला 20,000 रु इतकी मदत दिली जाते. सन 2008 पासून ही योजना सुरू झाली.

**राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (NRDWP - National Rural Drinking water Programme)**

- ग्रामीण पेयजल कार्यक्रमाचा 4 था टप्पा म्हणून NRDWP या

कार्यक्रमाची सुरूवात 1 April 2009 पासून करण्यात आली.

- ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या पहिल्या 3 टप्प्यांची माहिती आपण घेऊ.

➢ **पहिला टप्पा**

➤ गतिमान ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रम (Accelerated Rural water supply programme) ARWSP

➤ केंद्र सरकारचे 100% अनुदान असलेला हा कार्यक्रम 1972-73 मध्ये सुरू करण्यात आला

➤ प्राधान्यक्रम :

▶ दुष्काळाच्या संकटात सापडलेली जलविरहित खेडी (10 लिटरपेक्षा कमी प्रतिव्यक्ती पाणी उपलब्ध असलेली खेडी)

▶ SC/ST लोकसंख्या अधिक असलेली खेडी

▶ गुणवत्तारहित पाणीपुरवठा असलेली खेडी व त्यामध्ये जास्त विषारी प्रमाण असलेली खेडी

▶ ज्या शाळा/ अंगणवाडी यांना पेयजल उपलब्ध नाही यांना प्राधान्यक्रम देण्यात येईल.

➤ **तरतुदी**

▶ प्रत्येक व्यक्तीस प्रतिदिवस 40 लिटर सुरक्षित पेयजलाचा पुरवठा करणे.

| | |
|---|---|
| पिण्यासाठी | 3 लिटर |
| स्वयंपाक | 5 लिटर |
| अंघोळ | 15 लिटर |
| भांडी/कपडे धुणे | 7 लिटर |
| प्रात:विधी | 10 लिटर |
| **एकूण** | **40 लिटर** |

▶ वाळवंट विकास कार्यक्रमांतर्गत येणाऱ्या खेड्यांमध्ये जनावरांसाठी अतिरिक्त 30 लिटर दरडोई पेयजल पुरवणे.

▶ सुरक्षित पाण्याचा स्रोत हा घराच्या आत किंवा सपाट प्रदेशात 1.6 km व डोंगराळ प्रदेशात 100 मिटर पेक्षा कमी उंची या मर्यादेत असावा.

▶ प्रत्येक 250 व्यक्तींसाठी एक हातपंप उभारणे.

▶ पेयजलातील अर्सेनिक, लोह, फ्ल्युरॉइड, नायट्रेट यांचे प्रमाण कमी करणे.

➢ **दुसरा टप्पा : राष्ट्रीय पेयजल अभियान (National Drinking Water Mission)** - 1986 मध्ये ARWSP या कार्यक्रमाला 'तांत्रिक अभियानाचा' (Technology mission) दर्जा देऊन त्याचे नामांतर राष्ट्रीय पेयजल अभियान असे करण्यात आले.

➢ **तिसरा टप्पा : राजीव गांधी राष्ट्रीय पेयजल अभियान**

➤ 1991 मध्ये राष्ट्रीय पेयजल अभियानाला श्री. राजीव गांधी यांचे नाव देण्यात आले.

➤ **उद्दिष्टे**

▶ सर्व खेड्यांना स्वच्छ आणि सुरक्षित पेयजल पुरवणे.

▶ पेयजल स्रोत सुस्थितीत राखण्यास मदत करणे.

▶ SC/ST लोकसंख्येच्या पेयजल पुरवठ्यावर विशेष लक्ष केंद्रित करणे.

➤ 100 पेक्षा जास्त लोकसंख्या असलेली गावे ही राजीव गांधी राष्ट्रीय पेयजल अभियानाची लक्ष्य होती.

➢ **चौथा टप्पा : राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम**

➤ 1 April 2009 पासून या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

➤ 2005-06 पासून भारत निर्माण कार्यक्रम सुरू करण्यात आला, त्यातील 6 घटकांपैकी ग्रामीण पाणीपुरवठा हा एक प्रमुख घटक होता. 2005-06 ते 2009 पर्यंत भारत निर्माणचा पहिला टप्पा पार पडला. दुसरा टप्पा 2009-12 या दरम्यान राबविला गेला. त्याअंतर्गत आधीच्या राजीव गांधी राष्ट्रीय पेयजल अभियानाची पुनर्रचना करून राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यकम सुरू करण्यात आला.

➤ 2012 मध्ये NRDWP मध्ये बदल करण्यात आला व पाण्याच्या गुणवत्तेशी संबधित प्रश्नांवर भर देण्यात आला. त्यानुसार प्रथम अर्सेनिक व फ्ल्युरॉइड या प्रदूषकांनी प्रभावित वस्त्यांचे तर नंतर लोह, क्षारता, नायट्रेट या प्रदूषकांनी प्रभावित वस्त्यांचे प्रश्न हाताळण्याला अग्रक्रम देण्यात येत आहे.

➤ NRDWP मध्ये लोकसहभागाला प्राधान्य देण्यात येत आहे. ग्रामपातळीवर ग्रामआरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती गठित करण्यात आली आहे.

➤ पाणीपुरवठ्याच्या बाबतीत SC, ST अल्पसंख्याक समुदाय यांना समानतेच्या तत्त्वावर प्राधान्याने पाणी मिळेल याकडे लक्ष देणे.

➤ नक्षलप्रभावित प्रदेशात 100 पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या वस्त्यांना देखील NRDWP अंतर्गत पेयजल पुरवठ्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

➤ ग्रामीण पाणीपुरवठ्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी NRDWP अंतर्गत सात घटक

निश्चित करण्यात आले आहेत :
- पाणीपुरवठ्याचे क्षेत्र (Coverage)
- पाण्याची गुणवत्ता
- प्रचालन व देखभाल (Operation & Maintenance)
- शाश्वत पाणीपुरवठा
- नैसर्गिक आपत्ती
- वाळवंटी प्रदेश
- पाठबळ (Support)

➢ हा कार्यक्रम आता 2020 पर्यंत राबविण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी केंद्र आणि राज्याचा अनुक्रमे हिस्सा 50:50 असा आहे.

- **स्वजलधारा**

➢ ग्रामीण पेयजल कार्यक्रमांमध्ये क्षेत्रीय सुधार प्रकल्प (SRP-Sector Reform Project) यांच्या माध्यमातून1999 मध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा करण्यात आल्या.

➢ 25 Dec 2002 रोजी हा क्षेत्रीय सुधार प्रकल्प संपूर्ण देशात 'स्वजलधारा' या नावाने राबविण्यास सुरुवात झाली.

➢ स्वजलधारा योजना राबविण्यासाठी लोकसहभाग हा महत्त्वाचा घटक आहे. ग्रामसभेत ही योजना राबविण्याबाबतचा ठराव होणे गरजेचे असते. ग्रामपंचायतीने पाणीपुरवठा समिती स्थापन करून त्यात समान महिला-पुरुष घ्यावेत. या समितीच्या नावे बँकेत स्वतंत्र खाते असणे आवश्यक आहे.

➢ या योजनेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे पेयजल पुरवठ्याच्या योजना आता पुरवठाकेंद्रित पेक्षा मागणी केंद्रित बनल्या. लोकांचा पुढाकार त्यात शासनाचा सहभाग हे या कार्यक्रमाचे प्रमुख तत्त्व आहे.

➢ योजनेचे नियोजन विकेंद्रित स्वरुपाचे असून ग्रामपंचायतीमार्फत अंमलबजावणी केली जाते. विहीर व कूपनलिका उभारणीसाठी लागणाऱ्या खर्चापैकी 10% रक्कम ग्रामस्तरावरुन उभारली जाते तर 90% रक्कम केंद्रस्तराकडून दिली जाते. तसेच गावकऱ्यांना योजना पूर्ण झाल्यानंतर तिच्या क्रियान्वयन व व्यवस्थापनाची (Operation & Management) ची संपूर्ण जबाबदारी उचलावी लागते.

- **हरियाली योजना**

➢ 27 योजना 2003 रोजी एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम, अवर्षणग्रस्त क्षेत्र कार्यक्रम, वाळवंट विकास या कार्यक्रमात गावांचा समावेश करणे व पाणलोट क्षेत्रातील वनांचा विकास करणे या उद्देशाने ही योजना सुरू करण्यात आली.

➢ (DRDA) जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा ही प्रमुख नोडल एजन्सी असून अंमलबजावणीचे काम करते.

➢ प्रति हेक्टर 6,000 रु. वित्तपुरवठा केला जातो.

- दशलक्ष विहीर योजना आणि गंगा कल्याण योजना याबाबतची माहिती आपण यापूर्वी घेतली आहे.
- 7 Aug 2016 रोजी पंतप्रधान मोदी यांनी तेलंगणा राज्य सरकारच्या भगीरथ अभियानाचे उदघाटन केले. राज्यातील सर्वांना शाश्वत व सुरक्षित पेयजल पुरवठा करणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे.
- July 2016 मध्ये पाटणा येथे नवी योजना भारतीय टपाल सेवेमार्फत सुरू करण्यात आली. टपालाद्वारे घरपोच गंगाजल योजना याअंतर्गत गंगोत्री व ऋषिकेश येथून आणलेले गंगाजल लोकांना रास्त किमतीत घरपोहोच देणे.
- अमृत अभियान : शहरातील बेहिशोबी पाणीवापराचे प्रमाण कमी करणे व पाणीपुरवठ्याची व्याप्ती वाढवणे, यासाठी केंद्र शासनाने हे अभियान 2015 मध्ये सुरू केले. शहरातील नागरिकांना प्रतिव्यक्ती 135 लिटर पाणी पुरवणे हा या अभियानाचा उद्देश आहे. या अभियानाद्वारे राज्यातील 1 लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेली 43 शहरे व विशेष बाब म्हणून शिर्डी अशा 44 शहरांचा समावेश केला आहे.
- **पेयजल संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या विविध योजना खालीलप्रमाणे :**

➢ **पाणीटंचाई निवारण कार्यक्रम**

➢ दरवर्षी तीव्र पाणीटंचाई निर्माण झालेल्या गाव/वाड्यांमध्ये October ते June या कालावधीत टंचाई निवारण कार्यक्रम राबविला जातो.

➢ त्याअंतर्गत घेण्यात येणारी कामे :
- नवीन विंधण विहिरी (बोअर वेल) बांधणे
- जुन्या विंधण विहिरी व नळ पाणीपुरवठा योजनेची विशेष दुरुस्ती
- तात्पुरती पूरक नळयोजना
- टँकर/बैलगाडीने पाणीपुरवठा
- विहिरी खोलीकरण-त्यांच्यातील गाळ काढणे

➢ याच कार्यक्रमांतर्गत खालील विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत :
- 12 April ते 9 Aug 2016 या काळात लातूर शहराला रेल्वे वॅगनद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला.

- ➤ दुष्काळात जनावरांच्या चारा छावण्या सुरू करणे.

➢ **शिवकालीन पाणीसाठवण योजना**

- ➤ 2001 मध्ये महाराष्ट्र सरकारने सुरू केलेली ही योजना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाचा एक घटक आहे.
- ➤ जलसंधारणाच्या पारंपरिक व अपारंपरिक उपाययोजनाद्वारे पाण्याच्या स्त्रोतांचे मजबुतीकरण, छतावरील पावसाच्या पाण्याची साठवणूक, पावसाचे पाणी अडवण्यासाठी ग्रामीण भागात तलाव बांधणे इत्यादी उपायाद्वारे पिण्याचे पाणी कायम उपलब्ध करून देणे.

➢ **जलस्वराज्य योजना**

- ➤ ग्रामीण भागातील पाणीपुरवठ्याचा दर्जा आणि पर्यावरणास पूरक स्वच्छता सेवा सुधारणे या उद्देशाने महाराष्ट्र शासन ऑक्टोबर 2003 पासून 'जलस्वराज्य योजना' राबवत आहे.
- ➤ केंद्र सरकारच्या स्वजलधारा योजनेतील 4 जिल्हे आणि जर्मन सरकारच्या मदतीने चालू असलेल्या 'आपलं पाणी' प्रकल्पातील 3 जिल्हे वगळता इतर 26 जिल्ह्यांमध्ये जलस्वराज्यं योजना लागू करण्यात आली.
- ➤ ग्रामीण पाणीपुरवठा, ग्रामीण स्वच्छता आणि महिला सबलीकरण हे या कार्यकमाचे मूळ उद्देश आहेत.
- ➤ राज्यातील 26 जिल्ह्यांतील 3,000 गावांमध्ये पाणीपुरवठा योजना राबविण्यात आली. या प्रकल्पाच्या यशस्वितेमुळे जागतिक स्तरावरील USA चा पीपल्स फर्स्ट अॅवॉर्ड 2009 हा पुरस्कार मिळाला.

➤ **जलस्वराज्य Meaning**

- ▶ The initiative of the people and participation of the Government.
- ▶ Water supply and strengthening of the women and sanitation
- ▶ The Jalswarajya Project means - of the people , for the people and by the people

➤ महाराष्ट्र शासनाद्वारे जागतिक बँकेच्या मदतीने हा प्रकल्प राबवण्यात येत आहे.

- ▶ प्रथम टप्पा : 2003-2012
- ▶ दुसरा टप्पा : 2014-2020

- जलस्वराज्य - 2 कार्यक्रमांतर्गत 12 जिल्ह्यांमध्ये 6 महसूल विभागांतील प्रत्येकी 2 याप्रमाणे राबवला जात आहे.

| क्र. | विभाग | जिल्हे |
|---|---|---|
| 1 | अमरावती | बुलढाणा, अमरावती |
| 2 | औरंगाबाद | औरंगाबाद, नांदेड |
| 3 | कोकण | रायगड, रत्नागिरी |
| 4 | नागपूर | नागपूर, चंद्रपूर |
| 5 | नाशिक | जळगाव, अहमदनगर |
| 6 | पुणे | पुणे, सातारा |

- जलस्वराज्य - 2 अंतर्गत भौतिक गुंतवणूक मुख्य तीन घटकांतर्गत केली जाणार आहे.
  - (1) शहरालगत भागातील जनतेला वाढीव पाणी पुरवठा व स्वच्छतेच्या सेवा पुरवणे.
  - (2) दूषित पाणी असलेल्या वस्त्यांसाठी पाण्याचे दूषितीकरण कमी करण्यासाठी उपाययोजना.
  - (3) दुर्गम व पाणी टंचाई क्षेत्रात पर्जन्य साठवण उपाययोजना आणि अतिशोषित पाणलोट क्षेत्रात पाणी व्यवस्थापन करणे.
- जलस्वराज्य-2 हा मागणी आधारित कार्यक्रम असून राज्यातील 12 जिल्ह्यांसाठी प्रत्येकी ₹50 कोटी रकमेची पाणी पुरवठा योजना हाती घेण्यात येत आहे. शहरालगतच्या ग्रामपंचायती निश्चित करून 70 लिटर दरडोई दरदिवशी पाणी पुरवठा केला जाणार आहे. शहरालगतच्या योजनेमध्ये स्वयंचलित जलमापकासह 100% वैयक्तिक नळ जोडण्या देणे, त्यामार्फत दर दिवशी 4 तास व 7 मिटर दाबाने पाणी पुरवठा अपेक्षित आहे. सदर योजनांची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व सामाजिक उपक्रम जिल्हापरिषद मार्फत केली जाईल.
- 12 जिल्ह्यांतील 500 पेक्षा कमी लोकसंख्या असलेली टंचाईग्रस्त 102 गावे निवडण्यात आली आहेत. त्यांना शुद्ध व शाश्वत पिण्याचे पाणी उपलब्ध करुन दिले जाणार आहे. त्यासाठी Ro युनिट व Defloridation बसवण्यात येणार आहे.
- जलस्वराज्य - 2 या अंतर्गत 6 विभागीय प्रयोगशाळांचे बळकटीकरण करण्यात येणार आहे.

## महाराष्ट्र सुजल आणि निर्मल अभियान

- महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त राज्यशासनाने 2008-09 पासून सेवा शुल्कावर आधारित पाणी पुरवठा व स्वच्छतेची गुणवत्तापूर्वक सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी या अभियानांतर्गत तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय सुधारणा, करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे.

- पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व स्वच्छताविषयक सुविधा सर्व नागरिकांना उपलब्ध करुन देणे हा या अभियानाचा प्राथमिक उद्देश आहे.
- या अभियानांतर्गत खालील योजना राबवल्या जातात :

➢ **नागरी दलित वस्ती पाणीपुरवठा योजना**

➤ 25 Aug 2006 सुरुवात

➤ नागरी क्षेत्रातील दलित वस्त्यांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे.

➤ नागरी स्वराज्य संस्था यांना अनुज्ञेय अनुदान

| | |
|---|---|
| **नगरपरिषद** | अ वर्ग – 15 लाख<br>ब वर्ग – 12 लाख<br>क वर्ग – 10 लाख |
| **महानगर पालिका** | 32 लाख |

➤ सदर योजना वैयक्तिक लाभाची नसून सामूहिक लाभाची आहे.

➢ **महाराष्ट्र सुवर्णमहोत्सवी नागरी दलित वस्ती पाणीपुरवठा व स्वच्छता योजना**

➤ 25-6-2010 रोजी सुरवात

➤ राज्यशासनाची मागणी आधारित योजना असून नागरी भागातील SC व नवबौहर कुटुंबियांना खासगी नळजोडणी व वैयक्तिक शौचालय उपलब्ध करून देणे.

➤ शौचालय बांधकामासाठी रु 12,000 तर नळजोडणीसाठी 4,000 रु अनुदान अनुज्ञेय आहे. 90% अनुदान राज्य शासनाकडून तर उर्वरित 10% रक्कम लाभार्थी/नागरी स्था. स्वराज्य संस्था यांची असते.

➢ **महाराष्ट्र सुवर्णमहोत्सवी ग्रामीण दलित वस्ती पाणीपुरवठा व स्वच्छता योजना**

➤ Nov 2011 च्या शासननिर्णयाप्रमाणे राज्यात ग्रामीण भागात SC व नवबौद्ध घटकांमधील कुटुंबांना खासगी नळ जोडणीसाठी प्रति कुटुंब 4000 आणि वैयक्तिक शौचालय प्रतिकुटुंब 11000 याप्रमाणे अनुदान अनुज्ञेय आहे.

➤ संबधित योजना ग्रामपंचायतीमार्फत राबवायची असून 5% लोकसहभाग ग्रामपंचायतीने भरणे आवश्यक आहे.

## मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम

- ही राज्यपुरस्कृत योजना असून 2016 ते 2020 या चार वर्षांच्या कालावधीत राज्यातील ग्रामीण जनतेस पुरेसे व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आली आहे.
- ही योजना ग्रामीण भागातील जनतेसाठी आहे :

➢ गावाची लोकसंख्या किमान 1,000 असावी

➢ पाणीपुरवठ्याच्या सोयी उपलब्ध नसाव्या

➢ हाती घ्यावयाची योजना अन्य कोणत्याही कार्यक्रमामध्ये नसणे.

➢ पाणी पुरवठा नळ जोडणी किमान 80% तर मीटर नळजोडणी 100% साध्य करणे

➢ योजनेचे त्रयस्थ तांत्रिक परिक्षण करणे.

- शहरालगतच्या ग्रामपंचायती/ वाड्या व वस्त्यांसाठी 70 लिटर प्रतिव्यक्ती प्रतिदिन पाणीपुरवठा तर इतर ग्रामपंचायती/वाड्या/ वस्त्यासांठी 40 लिटर प्रतिव्यक्ती प्रतिदिन पाणीपुरवठा केला जाईल.
- **या योजनेत 3 घटक आहेत**

(1) कार्यक्रमांतर्गत घ्यावयाच्या नवीन योजना.

(2) बंद असलेल्या पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन

(3) प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल व दुरुस्ती.

## ग्रामीण पाणीपुरवठा 'आपलं पाणी' प्रकल्प

- जर्मन गव्हर्नमेंट डेव्हलपमेंट बँकेच्या अर्थसाहाय्याने ग्रामीण पाणीपुरवठा 'आपलं पाणी' प्रकल्प पुणे, अहमदनगर आणि औरंगाबाद या तीन जिल्ह्यांसाठी राबविला जात आहे.
- शाश्वत पाणीपुरवठा, पाणलोट क्षेत्र विकास तसेच भूजल व्यवस्थापन इत्यादीमार्फत आरोग्य व स्वच्छता यांमध्ये सुधारणा करणे हे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे.

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण – 10 मार्च 1997

- याचे अध्यक्ष हे ग्रामीण विकास, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री हे आहेत.
- महाराष्ट्रात पेयजल पुरवठा व सांडपाणी सुविधा निर्माण करण्याचे काम हे प्राधिकरण करते.

## Aquifer - भूजलाचा जमिनीखाली पसरलेला साठा म्हणजेच अ‍ॅक्वीफर होय.

- राज्यातील 6 जिल्ह्यांमधील (रत्नागिरी, पुणे, औरंगाबाद, जळगाव, बुलडाणा, नागपूर) वेगवेगळे भूजलसाठा क्षेत्र निवडून शाश्वत पाणीपुरवठा व्यवस्थापनाचा प्रयोग राबविण्यात येणार आहे.

## स्वच्छता कार्यक्रम

- 1954 मध्ये सर्वप्रथम प्राथमिक स्वरूपात स्वच्छता कार्यक्रमास सुरुवात झाली.
- 1981-91 हे दशक भारताकडून 'आंतरराष्ट्रीय पेयजल व स्वच्छता दशक' म्हणून साजरे करण्यात आले.
- UN-Water च्या अहवालानुसार जगात प्रत्येक 20 सेकंदाला एका बालकाचा मृत्यू केवळ अस्वच्छतेमुळे होतो.

### केंद्रीय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम (CRSP - Central Rural Sanitation Programme)

- स्वच्छतेसंबंधी हा कार्यक्रम 1986 मध्ये सुरू करण्यात आला. हा कार्यक्रम Allocation Based (वाटप) पद्धतीचा होता.
- उद्देश
  - ➢ ग्रामीण गरिबांच्या जीवनाची गुणवत्ता सुधारणे.
  - ➢ स्त्रियांना एकांत व आदर (Privacy & Dignity) मिळणे.
- 1992 मध्ये स्वच्छता म्हणजेच अस्वच्छतेचा अभाव ही संकल्पना स्पष्ट करण्यात आली.

### संपूर्ण स्वच्छता अभियान (TSC - Total Sanitation Campaign)

- 1999 मध्ये CRSP या कार्यक्रमाची पुनर्रचना करून TSC ची सुरुवात करण्यात आली.
- 1999 मध्ये जरी या अभियानाची सुरुवात झाली असली तरीही 2002 मध्ये याची व्याप्ती मोठ्या प्रमाणात वाढविण्यात आली.
- CRSP चे स्वरूप वाटप पद्धतीचे (Allocation Based) होते तर TSC चे स्वरूप मागणी आधारित सामुदायिक सहभाग आणि लोककेंद्रित होते.
- TSC चा मूळ उद्देश म्हणजे शौचालये बांधून त्याद्वारे उघड्यावरील उत्सर्गाची पद्धत पूर्णपणे बंद करून आरोग्य व स्वच्छतेस प्रोत्साहन देणे.
- 1999 मध्ये सुरू झालेल्या या अभियानाचे लक्ष्य 2012 पर्यंत स्वच्छता हे होते. मात्र नंतर हे उद्दिष्ट 2017 पर्यंत वाढविण्यात आले. MDG 2000 नुसार जगासाठी 2015 पर्यंत संपूर्ण स्वच्छता हे लक्ष्य ठेवले होते.
- शालेय स्वच्छता व वैयक्तिक स्वच्छता शिक्षण हा TSC चा महत्त्वाचा घटक होता. TSC च्या एकूण निधीपैकी 10% निधी या घटकावर खर्च केला जातो. विद्यार्थ्यांमध्ये आरोग्य शिक्षणाबाबत जागरूकता निर्माण करून त्यांना स्वच्छता दूत म्हणून तयार करणे.

### निर्मल भारत अभियान (NBA - Nirmal Bharat Abhiyan)

- 1 एप्रिल 2012 रोजी TSC चे रूपांतर निर्मल भारत अभियानात करण्यात आले.
- या अभियानाचा मूळ उद्देश म्हणजे 2022 पर्यंत देशातील सर्व ग्रामपंचायती निर्मल करून संपूर्ण ग्रामीण स्वच्छता प्राप्त करणे हा आहे.

**TSC व NBA यातील फरक**

| क्र. | TSC | क्र. | NBA |
|---|---|---|---|
| 1 | उद्दिष्ट - वैयक्तिक शौचालय पुरवणे | 1 | उद्दिष्ट - संपूर्ण ग्रामीण स्वच्छता निर्मल भारत |
| 2 | जिल्हा हे एकक | 2 | ग्रामपंचायत हे एकक आहे तर जिल्हा हे 'प्रकल्प' आहे. |
| 3 | 2012 व नंतर 2017 पर्यंत स्वच्छता हे लक्ष्य होते. | 3 | 2022 पर्यंत संपूर्ण स्वच्छता हे लक्ष्य होते. |

### स्वच्छ भारत अभियान

- 2 ऑक्टो 2014 या दिवशी स्वच्छ भारत मिशन सुरू करण्यात आले. पूर्वीच्या निर्मल भारत अभियानाची जागा स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) याने घेतली.
- निर्मल भारत अभियान हे केवळ ग्रामीण भागासाठी होते तर स्वच्छ भारत मिशन हे शहरी व ग्रामीण अशा दोन्ही भागांसाठी राबवले जात आहे. शहरी भागात हे पूर्णपणे नव्याने सुरू करण्यात आले.
- 2019 पर्यंत उघड्यावरील विसर्गाची पद्धत पूर्णपणे थांबविणे हे त्याचे व्यापक उद्दिष्ट आहे. 'एक कदम स्वच्छता की ओर' हे या अभियानाचे घोषवाक्य आहे.
- स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) हे पयेजल व स्वच्छता मंत्रालयामार्फत तर स्वच्छ भारत मिशन (शहरी) हे शहर विकास मंत्रालयामार्फत राबवले जाते.
- निर्मल भारत अभियानाचे अपेक्षित साध्य वर्ष 2022 हे होते तर स्वच्छ भारत मिशन अंतर्गत हे 2019 आहे. SDG (Sustainable Development Goals) अंतर्गत सर्वांना पाणी स्वच्छता व त्याचे शाश्वत नियोजन करणे हे ध्येय 2030 पर्यंत गाठायचे आहे.
- योजनेचे लक्ष्य आता 'निर्मल भारत' ऐवजी 'स्वच्छ भारत' असे आहे व 2019 पर्यंत सर्व ग्रामपंचायतींना निर्मल दर्जा मिळवून देणे.
- **वैयक्तिक कौटुंबिक शौचालय** – BPL व निवडक APL कुटुंबांना शौचालय बांधणीसाठी 12000 रु. दिले जातात. (केंद्र

राज्य वाटा 75 : 25 आहे. मात्र पूर्वोत्तर राज्य J & K व विशेष दर्जा राज्य यांसाठी हे प्रमाण 90 : 10 असे आहे.)

- सार्वजनिक स्वच्छतागृह बांधणी (Community Sanitory Complexes) यासाठी 2 लाखांची तरतूद आहे. यामध्ये केंद्र : राज्य : स्थानिक समुदाय यांचा वाटा 60 : 30 : 10 असा आहे.
- स्वच्छता उपकरणे बनविणारी केंद्रे तसेच ग्रामीण स्वच्छता बाजारांसाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी 35 लाख रुपयांची मदत.
- घन व द्रव कचरा व्यवस्थापन निधी : प्रत्येक ग्रामपंचायतीला तेथील कुटुंबांच्या संख्येनुसार 7 लाख ते 20 लाखांपर्यंत मदत. या खर्चाची विभागणी केंद्र : राज्य यामध्ये 75 : 25 या प्रमाणात.
- स्वच्छतेसंबंधी माहिती, शिक्षण, प्रसार यासाठी प्रकल्प खर्चाच्या 8% इतकी तरतूद करण्यात आली आहे.
- स्वच्छ भारत मिशन यासाठी प्रशासकीय खर्चाची तरतूद प्रकल्प खर्चाच्या 2% इतकी आहे.
- स्वच्छ भारत मिशन (शहरी) यासाठी देशातील 4041 शहरे निवडण्यात आली आहेत. या योजनेंतर्गत 'स्वच्छ भारत पुरस्कार' दिले जातील.
- 15 नोव्हें 2015 ला सर्व करयोग्य सेवांवर 0.5% इतका स्वच्छ भारत उपकर (cess) लागू करण्यात आला.
- उपकर (Cess) हा करावर आकारला जातो. मात्र स्वच्छ भारत उपकर हा सेवामूल्यावर आकारला जात आहे.
- स्वच्छ भारत गीत : 'स्वच्छ भारत का इरादा'
  - ➢ लेखक : प्रसून जोशी
  - ➢ गायक : कैलाश खरे / ईशान्या जोशी
- 2019 पर्यंत सर्व रेल्वेमध्ये Bio-Toilet उभारले जातील. तसेच रेल्वेमध्ये Clean My Coach Service ही SMS सुविधा सुरू झाली आहे. शाळामधील शौचालय उभारणीसाठी मानव संसाधन मंत्रालय मदत करेल तर अंगणवाडीमधील शौचालयांच्या उभारणीसाठी महिला व बालविकास मंत्रालय मदत करेल.
- जाने 2017 पर्यंत स्वच्छ भारत अभियानांतर्गत महाराष्ट्र राज्यात जवळपास 12000 ग्रामपंचायती उघड्यावरील मलविसर्जनमुक्त झाल्या आहेत ही संख्या देशात सर्वाधिक आहे.
- स्वच्छ भारत सर्वेक्षणाअंतर्गत सिंधुदुर्ग (महाराष्ट्र), मंडी (हिमाचल) हे सर्वाधिक स्वच्छ जिल्हे म्हणून घोषित करण्यात आले आहेत. याशिवाय सातारा, कोल्हापूर, रत्नागिरी, ठाणे हे जिल्हे देशात प्रथम 10 मध्ये आहेत.
- शहरी पाणीपुरवठा व स्वच्छता याबाबत जून 2015 पासून 'अमृत' योजना सुरू करण्यात आली आहे.
- स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) अंतर्गत सिक्कीम, हिमाचल प्रदेश, केरळ, उत्तराखंड, हरियाणा ही राज्ये उघड्यावरील शौचापासून मुक्त म्हणून घोषित करण्यात आली.
- **स्वच्छ भारत अभियानाची विशेषता**
  - ➢ 2 ऑक्टोबर 2014 ला पंतप्रधान यांनी या अभियानाची सुरुवात करताना विविध क्षेत्रांतील नामवंत 9 लोकांना आमंत्रित करून त्यांना सार्वजनिक ठिकाणच्या स्वच्छतेसाठी स्वच्छता दूत म्हणून नेमले. या 9 व्यक्तींनी पुढे 9-9 लोकांना सार्वजनिक स्वच्छतेसाठी प्रोत्साहित करावे व अशाप्रकारे स्वच्छतेची साखळी बनवावी ही संकल्पना राबविण्यात येत आहे.
  - ➢ या अभियानाचे बोधचिन्ह अनंत खासदरबार (कोल्हापूर) तर बोधवाक्य भाग्यश्री सेठ (राजकोट) यांनी तयार केले.
  - ➢ स्वच्छ भारत मिशन राबविण्यात म्हैसूर देशात प्रथम आहे. नवी मुंबळ 3 ऱ्या तर पुणे 21 व्या क्रमांकावर आहे.
  - ➢ ग्रामीण भागातील खुले मलमूत्र विसर्जन (Open defecation) संपवण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी 20 लाख रू. वार्षिक अनुदान मंजूर करण्यात येईल.
  - ➢ 2 ऑक्टोबर 2019 पर्यंत 1 कोटी वैयक्तिक घरगुती स्वच्छतागृहे व 2.5 लाख सार्वजनिक स्वच्छतागृहे निर्माण करणे हे संख्यात्मक उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.
  - ➢ स्वच्छता सप्तपदी योजना - महाराष्ट्र शासनामार्फत केंद्राच्या स्वच्छ भारत अभियानास पूरक म्हणून मे 2015 ला मुंबई येथे मुख्यमंत्री व आमिर खान यांच्या उपस्थितीत सुरू झाली.

## निर्मलग्राम पुरस्कार योजना

- पंचायतराज संस्थांना ग्रामीण स्वच्छताविषयक सुविधा राबविण्यासाठी 'प्रोत्साहन देणारी योजना' TCS चा उपघटक म्हणून 2003 मध्ये घोषित करण्यात आली. मात्र प्रत्यक्षात पुरस्कार देण्यास 2005 मध्ये सुरुवात झाली.
- Fully Sanitized & Open defecation free ग्रामपंचायत, तालुका, जिल्हा, राज्य यांना राष्ट्रपतींच्या हस्ते निर्मल ग्राम पुरस्कार देण्यात येत असे.
- तसेच या क्षेत्रात उत्तम काम करणाऱ्या व्यक्ती व संस्था यांनाही रोख पारितोषिक देण्यात येत असे.
- 2011 पर्यंत हे पुरस्कार केंद्रीय पेयजल व स्वच्छता मंत्रालयामार्फत देण्यात येत असे.
- 2012 मध्ये निर्मल भारत अभियान सुरू झाल्यानंतर हे पुरस्कार राज्यशासन देत होते तर केंद्र सरकार पुरस्कार विजेत्यांची निवड करत असे.

- या पुरस्कारातून मिळालेल्या रकमेचा वापर पंचायत संस्थांनी आपल्या कार्यक्षेत्रातील स्वच्छता कामांसाठी करणे अपेक्षित आहे.
- 2013 मध्ये जाहीर करण्यात आलेले व 2015 मध्ये वितरित झालेले निर्मल ग्राम पुरस्कार हे शेवटचे पुरस्कार ठरले आहेत. यानंतर निर्मलग्राम पुरस्कार देणे थांबवण्यात आले.
- पहिला निर्मलग्राम पुरस्कार सिक्कीम राज्याला मिळाला. या पुरस्कारांपैकी ग्रामपंचायत स्तरावरील सर्वाधिक पुरस्कार महाराष्ट्र राज्याला मिळाले, तर पंचायत समिती आणि जिल्हा परिषद स्तरावरील सर्वाधिक पुरस्कार केरळ राज्याला मिळाले.
- महाराष्ट्रातील कोणत्याही जिल्ह्याला हा पुरस्कार मिळाला नाही. राज्यतील 11 तालुक्यांना हे पुरस्कार मिळाले त्यापैकी सर्वाधिक पुरस्कार प्राप्त तालुके हे कोल्हापूर जिल्ह्यातील आहेत. सर्वाधिक पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायती सातारा जिल्ह्यातील आहेत.

## संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान

- 2000-01 पासून महाराष्ट्र शासनाने हे अभियान सुरू केले. याअंतर्गत हागणदारी मुक्त झालेल्या ग्रामपंचायती, पंचायत समिती, जिल्हा परिषद यांना पुरस्कार दिले जातात.
- ग्रामीण लोकांना प्रोत्साहन देण्यासाठी या अभियानांतर्गत 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा' सुरू केली आहे.
- सन 2008-09 पासून या अभियानांतर्गत जिल्हा परिषद मतदार संघ स्तरावरील मिळालेल्या गुणांवरून ग्राम पंचायतीची 3 गटांत वर्गवारी करण्यात येते.
  (1) 60% व त्यापेक्षा अधिक गुण
  (2) 50-59% गुण
  (3) 49% व त्यापेक्षा कमी गुण.
- ग्रामपंचायतीने केलेल्या कामगिरींच्या मूल्यमापनाचे निकष

| क्र. | निकष | गुण |
|---|---|---|
| 1 | शौचालय व्यवस्थापन | 25 |
| 2 | पाणी व्यवस्थापन | 20 |
| 3 | सांडपाणी व्यवस्थापन | 10 |
| 4 | घनकचरा व्यवस्थापन | 10 |
| 5 | कुटुंब कल्याण | 10 |
| 6 | लोकसहभाग | 10 |
| 7 | घर/गाव स्वच्छता | 5 |
| 8 | वैयक्तिक स्वच्छता | 5 |
| 9 | नावीन्यपूर्ण उपक्रम | 5 |
| | एकूण | 100 |

- उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायतींना राज्यस्तरावर बक्षिसाची रक्कम

| क्रमांक | पंचायत समिती स्तर | जिल्हा स्तर | विभागीय स्तर | राज्यस्तर |
|---|---|---|---|---|
| प्रथम | 25000 | 5 लाख | 10 लाख | 25 लाख |
| द्वितीय | 15000 | 3 लाख | 8 लाख | 20 लाख |
| तृतीय | 10000 | 2 लाख | 6 लाख | 15 लाख |

- उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायतींना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या नावाने पुरस्कार दिले जातात.
- हागणदारीमुक्त झालेल्या प्रत्येक पंचायत समितीला 4 लाख तर जिल्हा परिषदेस 20 लाख अशी बक्षिसे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या नावाने दिली जातात.
- 2005-06 पासून स्वच्छ अंगणवाडी व स्वच्छ प्राथमिक शाळांची निवड करण्यात येऊन त्यांना अनुक्रमे सावित्रीबाई फुले स्वच्छ अंगणवाडी व साने गुरुजी स्वच्छ प्राथमिक शाळा यांच्या नावाने पारितोषिक रोख बक्षिसाच्या स्वरूपात दिले जाते.

## संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान

- 2002-03 पासून सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये हे अभियान महाराष्ट्र शासनामार्फत राबवले जाते.

## एकात्मिक कमी खर्चाची स्वच्छता योजना

- 1996-97 पासून राज्यशासनाने सदर योजना सुरू केली.
- झोपडपट्टी व अनाधिकृत वसाहती यांच्यासह जेथे शौचालय नाही अथवा शुष्क शौचालय आहेत अशा सर्व कुटुंबांना मागणी आधारित शौचालय उपलब्ध करून देणे हा या योजनेचा मूळ उद्देश होता.

## स्वच्छ युग

- हा कार्यक्रम स्वच्छ भारत मिशन या अंतर्गत राबविला जाणार आहे.
- गंगा किनाऱ्यावरील गावांचा विकास करून गंगा नदीचे होणारे प्रदूषण कमी करणे.
- उत्तर प्रदेश, झारखंड, उत्तराखंड, बिहार, पश्चिम बंगाल या पाच राज्यांतील गंगा नदीच्या किनारी वसलेल्या 5,169 गावांचा विकास केला जाईल. नेहरू युवा केंद्र संघटन, स्काऊट आणि गाईड, NSS यांचे स्थानिक पातळीवर सहकार्य लाभणार आहे.
- 6 जून 2016 ला या योजनेची घोषणा करण्यात आली.

## नमामि गंगे (राष्ट्रीय गंगा स्वच्छता अभियान)

- मे 2015 मध्ये या अभियानाची सुरुवात झाली. 2015-

19 या 5 वर्ष कालावधीसाठी हे अभियान राबवले जाईल.

- हा 100% केंद्रपुरस्कृत प्रकल्प असून मार्च 2019 पर्यंत गंगेत सांडपाणी सोडलं जाणार नाही हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.
- 1986 मध्ये गंगा कृती योजना, पुढे स्वच्छ गंगा अभियान, राष्ट्रीय गंगा नदी खोरे प्राधिकरण (PM अध्यक्ष) इत्यादी उपक्रम राबवण्यात आले. 'नमामि गंगे' हा या उपक्रमांचा पुढील टप्पा आहे.
- या प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी Ganga Task Force स्थापन करण्यात आले आहे. तसेच गंगा नदीच्या किनाऱ्यावर राहणाऱ्या लोकांना तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांना सहभागी करून घेतले जाणार आहे.
- निर्मल धारा : सांडपाणी व औद्योगिक उत्सर्जन यांचे योग्य व्यवस्थापन करून गंगेचा प्रवाह प्रदूषणमुक्त करणे.
- अविरत धारा : गंगा तीरावर नदी नियामक प्राधिकरण स्थापन करून नदी संवर्धनासाठीचा कार्यक्रम राबवणे.
- गंगा ज्ञान केंद्र : गंगा नदीसंदर्भात ज्ञानव्यवस्थापन
- गंगा वहिनी : गंगा शुद्धीकरणासाठी हे स्वयंसेवक गट स्थापन करण्यात येतील.
- स्वच्छ गंगा निधी – गंगा नदीच्या संरक्षण व संवर्धनासाठी स्थापन करण्यात आला.

## वाहतूक आणि दळणवळण

- भारतामध्ये कृषी विकास व औद्योगिक क्षेत्राचा विकास साध्य करण्यासाठी 1927 साली जयकर आयोग स्थापन करण्यात आला. सदर आयोगाकडे भारतासाठी रस्ते धोरण विकसित करण्याचे काम सोपवण्यात आले.
- 1943 साली ब्रिटिश सरकारने प्रथम रस्ते विकासासाठी भारतीय रस्ते काँग्रेसच्या अभियंत्यांची एक परिषद नागपूर येथे भरवली. (या परिषदेला नागपूर योजना असेही म्हणतात.) त्यामुळे रस्तेबांधणीचा आधुनिक काळ या परिषदेपासून सुरू झाला असे म्हणता येईल.
- भारतीय रस्ते काँग्रेसच्या अभियंत्यांनी तयार केलेल्या 20 वर्षांच्या योजना केंद्र व राज्य सरकारांसाठी मार्गदर्शक ठरल्या आहेत.
  (1) नागपूर योजना (1943–61)
  (2) बॉम्बे योजना (1961–81)
  (3) लखनौ योजना (1981–2001)
  (4) रस्ते विकास योजना Vision-2021
- बारमाही रस्त्यांची कमतरता ही देशातील वाहतुकीसमोरील समस्या आहे. ग्रामीण रस्त्यांच्या विकासासाठी सर्वप्रथम पाचव्या पंचवार्षिक योजनेत 1974 ला विविध योजना राबविण्यास सुरुवात झाली. भारतातील रस्त्यांची वेग क्षमता सरासरी 30–40 km /तास इतकी आहे.
- राष्ट्रीय ग्रामीण रस्ते विकास संस्था जाने. 2002 मध्ये स्थापन करण्यात आली. प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ही संस्था स्थापण्यात आली.
- 1988 मध्ये NHAI स्थापन करण्यात आले.
- 1998 मध्ये NHDP हा कार्यक्रम सुरू झाला.
- 1960 मध्ये BRO म्हणजे सीमा रस्ते संघटना स्थापन करण्यात आली.
- इंडियन ॲकॅडमी ऑफ हायवे इंजीनिअर्स ही महामार्गाबरील प्रशिक्षणाशी संबंधित संस्था असून तिची स्थापना संस्था नोंदणी कायदा, 1860 अंतर्गत 1983 मध्ये करण्यात आली. रस्ते क्षेत्रात संशोधन करण्यासाठी. केंद्रीय रस्ते संशोधन संस्था (Central Road Research Institute) नवी दिल्ली या ठिकाणी कार्यरत आहे. केंद्र शासनाने रस्ते विकासाबाबत धोरण ठरवण्यासाठी श्री. डी. थंगराज यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली होती. या समितीने आपला अहवाल 2008 मध्ये सरकारला दिला केंद्रीय रस्ते निधी (Central Road Fund) रस्ते विकासासाठी लागणारा खर्च उभारणीसाठी सरकारने हा निधी निर्माण केला. त्याला सन 2000 मध्ये वैधानिक दर्जा दिला. सध्या पेट्रोल व डिझेलवर प्रतिलिटर 2 रुपये एवढा उपकर आकारला जातो. त्यास fuelcess असे म्हटले जाते. निधीचा वापर राष्ट्रीय महामार्ग विकासासाठी केला जातो. सरकारने महामार्ग विकासासाठी इंधन उपकरा व्यतिरिक्त जागतिक बँक, आशियाई विकास बँक व जपान बँक फॉर इंटरनॅशनल कोऑपरेशन यांच्याकडून कर्जेही घेतली आहे. देशातील रस्त्यांमध्ये पुढील रस्त्यांचा समावेश होतो.
  - ➢ राष्ट्रीय महामार्ग
  - ➢ राज्य महामार्ग
  - ➢ मुख्य जिल्हा महामार्ग
  - ➢ इतर जिल्हा महामार्ग
  - ➢ ग्रामीण रस्ते

### प्रधानमंत्री ग्रामसडक योजना (PMGSY)

- 25 डिसेंबर 2000 रोजी ही केंद्रपुरस्कृत योजना सुरू करण्यात आली. योजना सुरुवातीला 100% केंद्रपुरस्कृत होती. मात्र 2015–16 पासून केंद्र : राज्य खर्च विभागणी 60 : 40

अशी झाली आहे. (पूर्वोत्तर व हिमालयीन राज्यांसाठी 90 : 10) या योजनेसाठी केंद्रीय रस्ते निधीमध्ये जमा झालेल्या High Speed Diesel (HSD) वरील उपकराच्या (cess) 50% रक्कम वापरली जाते. तसेच नाबार्ड, World Bank, ADB यांची मदतही यासाठी घेतली जात आहे.

- या योजनेचे उद्दिष्ट सपाट प्रदेशातील 500 पेक्षा अधिक लोकवस्तीच्या तर डोंगराळ/आदिवासी/दुर्गम भागात 250 पेक्षा जास्त लोकवस्तीच्या गावांना सिंगल बारमाही रस्त्याने जोडणे हे आहे.
- 2000 ते 2012 पर्यंत PMGSY चा पहिला टप्पा राबवला गेला. 2013 पासून या योजनेचा दुसरा टप्पा सुरू झाला आहे त्यानुसार या योजनेंतर्गत तयार झालेल्या ग्रामीण रस्त्यांचे दर्जावर्धन, नूतनीकरण, देखभाल ही कामे हातात घेण्यात आली होती.
- 2017 ते 2019 या काळात राबवल्या जाणाऱ्या PMGSY III या तिसऱ्या टप्प्याची सध्या अंमलबजावणी सुरू आहे. त्यानुसार 2019 पर्यंत सर्व गावांना बारमाही रस्त्यांनी जोडण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे. नक्षलग्रस्त प्रदेशातील 100 पेक्षा कमी लोकसंख्येची गावे बारमाही रस्त्याने जोडण्याचे काम PMGSY-III या टप्प्यात हाती घेण्यात आले आहे.
- **भारत निर्माण योजनेंतर्गत** सपाट प्रदेशातील 1,000 व त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ठिकाणांना आणि डोंगराळ/वाळवंटी प्रदेशात 500 पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावांना 2009 पर्यंत किमान एका बारमाही रस्त्याने जोडण्याचे ध्येय ठेवण्यात आले होते.
- 31 मे 2018 रोजी भारत सरकार व World Bank यांच्यात 500 दशलक्ष डॉलरचा करार झाला त्याद्वारे PMGSY अंतर्गत 7000 किमी. चे रस्ते बांधले जातील. त्यापैकी 3500 किमी. रस्त्यांचे बांधकाम हरित तंत्रज्ञानाद्वारे होईल.

## मुख्यमंत्री ग्रामसडक योजना

- PMGSY या योजनेच्या धरतीवर महाराष्ट्र सरकारने ही योजना ऑक्टो 2015 मध्ये सुरू केली.
- सर्वसाधारण/सपाट प्रदेशात 500 पेक्षा जास्त तर आदिवासी क्षेत्रात 250 पेक्षा जास्त लोकसंख्या असलेली गावे पक्क्या रस्त्याने जोडणे.
- ही योजना ग्रामविकास खात्याच्या 'महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था' यामार्फत राबवली जात आहे.

## राष्ट्रीय हरित महामार्ग प्रकल्प

- 30 सप्टेंबर 2015 रोजी जाहीर
- महामार्गाच्या हरितकरणासाठी पुढील 5 वर्षांत 5,000 कोटी खर्च करणार. 5 लाख लोकांना रोजगार मिळणार.
- 12,000 हेक्टर झाडे लावण्यात येतील.
- झाडे लावण्याबरोबर त्यांचे संवर्धन व ती टिकली तरच संबंधितांना पैसे मिळणार.
- सर्वप्रथम दिल्ली कटरा या महामार्गावर ही योजना प्रायोगिक तत्त्वावर राबविली जाणार.
- या प्रकल्पाच्या देखरेख व प्रगतीसाठी इस्रोचे सहकार्य.

## राष्ट्रीय हरित महामार्ग मिशन

- याची सुरुवात 1 जुलै 2016 रोजी नितीन गडकरी यांनी केली.
- हरित महामार्ग धोरण 2015 अंतर्गत या मिशनची सुरुवात.
- या मिशनअंतर्गत 5,000 कोटी रुपये खर्च करून 1 लाख किमी. राष्ट्रीय महामार्गांना हिरवे छत देण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे.

## सेतू भारतम् योजना

- 4 मार्च 2016 सुरुवात.
- केंद्र सरकारचा प्रकल्प असून 2019 पर्यंत रेल्वे क्रॉसिंगवरून भारतातील सर्व राष्ट्रीय महामार्ग मुक्त करणे हा उद्देश आहे.
- 20,800 कोटी रुपये खर्च करून 208 ठिकाणी Railway Over Bridge/Railway Under Bridge नव्याने निर्माण होणार आहे.
- तसेच 30,000 कोटी खर्च करून 1,500 ब्रिटिशकालीन पुलांची दुरुस्ती करण्यात येणार आहे.

## सागरमाला प्रकल्प

- 15 ऑगस्ट 2003 रोजी तत्कालीन पंतप्रधान अटलजी वाजपेयी यांनी सागरमाला प्रकल्पाची घोषणा केली होती. 25 मार्च 2015 रोजी या प्रकल्पाला मान्यता देण्यात आली.
- या प्रकल्पांतर्गत 12 मुख्य बंदरे व 1,208 बेटांचा विकास करण्यात येणार आहे. त्याद्वारे जलवाहतूक व व्यापाराला चालना देणे हा उद्देश आहे.

## ग्रामीण दूरसंचार

- दुर्गम व ग्रामीण भागामध्ये दूरसंचार सेवा पुरवणे. या भागात दूरसंचार सेवांचा विकास करणे यासाठी 1999 च्या दूरसंचार धोरणात वैश्विक सेवा अनिवार्यता निधी स्थापन करण्यात आला. (Universal Service Obligation Fund)
- यानुसार परवानाधारक असलेल्या विविध दूरसंचार सेव[...] पुरविणाऱ्या कंपन्यांच्या महसुलातील विशिष्ट भाग ह[...] Universal Access Levy म्हणून आकारला जातो. या[...] उपयोग वैश्विक सेवा अनिवार्यता उद्दिष्ट साध्य करण्यास[...]